## खासदारांच्या पगार, पेन्शनमध्ये मोठी वाढ

**नवी दिल्ली, दि. २४ प्रतिनिधी**

केंद्र सरकारने खासदारांच्या मानधनाबाबत सर्वात मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने खासदारांच्या पगार, दैनिक भत्ता आणि पेन्शनमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला असून यासंबंधीची अधिसूचना जारी केली आहे. संसदीय कामकाज मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, ही सुधारित वेतनश्रेणी १ एप्रिल २०२३ पासून लागू होईल. महागाई लक्षात घेऊन केंद्र सरकारने सदस्यांचे वेतन, भत्ते आणि पेन्शन कायदा, १९५४ अंतर्गत वेतन आणि पेन्शनमध्ये सुधारणा केली आहे. खासदारांचे मासिक वेतन पूर्वी एक लाख रुपये होते. जे आता १,२४,००० रुपये प्रति महिना करण्यात आले आहे. त्याच वेळी, दैनिक भत्ता २००० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आला आहे. माजी खासदारांचे मासिक पेन्शनही २४,००० रुपयांवरून ३१,००० रुपये करण्यात आले आहे. ५ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवेसाठी अतिरिक्त पेन्शन जे पूर्वी दरमहा २००० रुपये होते, ते देखील बदलून २५०० रुपये प्रति महिना करण्यात आले आहे.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » मंगळवार, २५ मार्च २०२५ » वर्ष: ६ » अंक:९६ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


अग्राग्रलेख

**खरीखरी**

## विधानसभेचा खरा मार्ग

आज महाराष्ट्राच्या विधानसभेने एक ऐतिहासिक प्रस्ताव एकमताने मान्य केला. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार देण्याचा ठराव विधानसभेने पारित करणे आणि तोही एकमताने पारित करणे. हा महाराष्ट्राच्या समन्वयवादी आणि समतावादी विचारांचा विजय आहे. महात्मा फुले यांनी शिक्षणाची महती जाणली होती. त्यामुळेच बहुजन समाजातील मुला-मुलींनी शिकले पाहिजे, हा त्यांचा ध्यास होता. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांना प्रशिक्षित केले. पुण्यासारख्या शहरात प्रखर विरोध असतानाही मुलींची शाळा सुरू केली. शेतकऱ्यांसाठी, कष्टकऱ्यांसाठी, खचलेल्या आणि पिचलेल्या पीडितांसाठी महात्मा फुले यांनी आपला देह अहोरात्र झिजविला. यामुळेच पुढे सर्व दृष्टीने दुर्लक्षित असणाऱ्या समाजाला शिक्षणाचा एक मार्ग सापडला. महात्मा फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या जीवनात मोठी क्रांती घडवून आणली. त्यामुळे दलित समाज डॉ. बाबासाहेबांच्या इतकेच महात्मा फुले यांना मानतो आणि त्यांचेही नाव तेवढेच आदराने घेतले जाते. आज महाराष्ट्रातच नाही, तर देशातही महात्मा ज्योतिराव फुले यांच्या बांधिलकी असणाऱ्या विचारांची गरज आहे. आज-काल नको ते चिल्लर विषय चघळले जातात. हे आपल्या समाजाचे दुर्दैव आहे. ज्या समाजाच्या उत्थानाकरिता महात्माजी फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर लढा दिला. तो समाज आज बराच जागृत झाला आहे. शिक्षणाचे महत्त्व जाणून कधीच न शिकलेल्या घरातील मुले-मुली आता उच्च शिक्षण घेऊ लागली आहेत. उच्च पदावर आरुढ होऊन देशाच्या विकासाच्या मार्गाला ही मंडळी सुद्धा हातभार लावीत आहेत. आज महाराष्ट्राच्या विधानसभेने जो प्रस्ताव एकमताने मंजूर केला. ते कार्य यापूर्वीच होणे गरजेचे होते. ठीक आहे, उशीर झाला तरी हरकत नाही. आता महाराष्ट्राच्या जनतेला लवकरच सकारात्मक उत्तर मिळेल आणि त्यामुळे संपूर्ण देशभर समतेची बीजे रोवली जातील. असा विश्वास आपण व्यक्त केला तर ते वावगे ठरू नये. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड म्हणून जे विचार व्यक्त केलेले आहेत. ते आजही शेतकऱ्यांसाठी समर्पकच आहेत. जे प्रश्न शंभर- दीडशे वर्षांपूर्वी होते. तेच प्रश्न आजही तसेच उभे आहेत. त्यामुळे आज पूर्वीपेक्षाही मोठ्या प्रमाणावर फुले आणि आंबेडकरांच्या विचारांची देशभर पखरण होणे. त्यातूनच समाजाला नवी दिशा मिळणे अत्यंत गरजेचे आहे. उशिरा का होईना आता प्रस्ताव आला आहे, तर भारत सरकारने महाराष्ट्राच्या या महापुरुषाला लवकरात लवकर गौरविले पाहिजे. आगामी वर्षात 'भारतरत्न महात्मा फुले' यांच्या नावाची घोषणा करण्यात येईल, असे आश्वासन केंद्राने तात्काळ दिले पाहिजे. हाच महाराष्ट्राच्या विधानसभेचा खरा मार्ग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज याबाबतीत देशातील प्रभावशाली नेते मानले जातात. त्यांनी पाठपुरावा करून आपल्या विधानसभेने एकमताने पारित केलेला प्रस्ताव पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करावा. एवढीच आमची विनंती आहे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# कामराप्रकरणी शिंदे गटाचे विधानभवनात आंदोलन

## जाणूनबुजून बदनामी करणे सहन केले जाणार नाही - मुख्यमंत्री

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. कामराने आपल्या एका शोमध्ये शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणे सादर करत त्यांना 'गद्दार' संबोधले होते, ज्यामुळे शिंदे गटाचे शिवसैनिक संतप्त झाले आणि त्यांनी अंधेरीतील स्टुडिओची तोडफोड केली. या घटनेनंतर आज विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर शिंदे गटाच्या आमदार आणि मंत्र्यांनी कामराविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले.

फडणवीस यांनी विधानभवन आवारात आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले, "स्वातंत्र्याचा स्वैराचार करण्याचा कोणालाही अधिकार नाही. कोण खुद्दार आहे आणि कोण गद्दार आहे, हे जनतेने दाखवून दिले आहे. अशा प्रकारे कोणाचा अनादर करण्याचा अधिकार कुणालाही नाही. संविधानाने सांगितले आहे की, स्वातंत्र्याचा स्वैराचार करता येणार नाही. कुणाल कामराने माफी मागितली पाहिजे." त्यांनी पुढे सांगितले की, "माजी मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अपमान करण्याचे काम कामराने केले, हे चुकीचे आहे. स्टँडअप कॉमेडी अशी करू शकत नाही. व्यंग करण्याचा अधिकार आहे, पण जाणूनबुजून अपमान करणे किंवा बदनामी करणे सहन केले जाणार नाही. यावर कायदेशीर कारवाई केली जाईल."

फडणवीस यांनी कामराच्या संविधानाच्या उल्लेखावरही टीका केली. "कामराने माफी मागितली पाहिजे. हे लाल संविधान राहुल गांधी सुद्धा दाखवतात, पण जे संविधान कामराने वाचलेले नाही," असे म्हणत त्यांनी कामराच्या वक्तव्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दुरुपयोग असल्याचे संबोधले.


**विधानभवनात शिंदे गटाचे आंदोलन**

या प्रकरणावरून शिंदे गटाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. आज विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर शिंदे गटाचे मंत्री आणि आमदारांनी कुणाल कामराविरोधात घोषणाबाजी केली. "कुणाल कामरा माफी माग", "शिंदे साहेबांचा अपमान खपवून घेणार नाही" अशा घोषणा देत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. शिंदे गटाचे आमदार मुरजी पटेल यांनी यापूर्वीच कामराविरोधात एफआयआर दाखल केली असून, त्याला दोन दिवसांत माफी मागण्याचा इशारा दिला आहे. आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी कामराच्या अटकेची मागणीही केली.

**वादाची पार्श्वभूमी**

कुणाल कामराने आपल्या 'नया भारत' या शोमध्ये एकनाथ शिंदे यांच्या २०२२ च्या बंडखोरीवर विडंबनात्मक गाणे सादर केले होते. 'दिल तो पागल है' या चित्रपटातील गाण्याच्या धर्तीवर "गद्दार वो नजर आए" असे म्हणत त्याने शिंदे यांना लक्ष्य केले. या गाण्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी अंधेरीतील युनिकॉन्टिनेंटल स्टुडिओवर हल्ला चढवून तोडफोड केली. या घटनेनंतर पोलिसांनी तोडफोड करणाऱ्या शिवसैनिकांवर गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाने राजकीय वातावरण तापले आहे. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत आणि आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटाच्या तोडफोडीचा निषेध करत



कामराच्या गाण्याला पाठिंबा दिला आहे, तर शिंदे गटाने हे वक्तव्य बदनामीचे षड्यंत्र असल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, कुणाल कामराने संविधानाचा फोटो पोस्ट करत "पुढे जाण्याचा एकमेव मार्ग" असे कॅप्शन दिले आहे, परंतु त्याने अद्याप या वादावर थेट भाष्य केलेले नाही.

फडणवीस यांच्या या वक्तव्याने आणि शिंदे गटाच्या आंदोलनाने हे प्रकरण आणखी चिघळण्याची शक्यता आहे. पोलिसांनी कामराविरोधात दाखल केलेल्या एफआयआरवर आता कायदेशीर कारवाई कशी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कुणाल कामराचे लोकेशन ट्रेस करत आहोत, कायदा हातात घेणाऱ्यांवर होणार कारवाई - योगेश कदम

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधान भवन आवारात पत्रकारांशी बोलताना वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या विनोदी कलाकार कुणाल कामरा याच्यावर कडक कारवाईचा इशारा दिला आहे. "कुणाल कामराचं लोकेशन आम्ही ट्रेस करतोय. जो कोणी कायदा हातात घेईल, त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल," असं कदम यांनी ठणकावून सांगितलं. संविधानाने बोलण्याचा अधिकार दिला असला तरी संविधानिक पदावर असलेल्या व्यक्तींवर टीका करणं योग्य नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. ठाकरे गटावरही निशाणा साधताना ते म्हणाले, "ठाकरे गटाने कायदा आणि सुव्यवस्था आम्हाला शिकवू नये. राज्यात शांतता राखण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

कुणाल कामरा याने अलीकडेच सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची सरकारने गंभीर दखल घेतल्याचं दिसत आहे. कदम यांच्या वक्तव्यावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली असून, काहींनी याला अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला असल्याचा आरोप केला आहे. तर काहींनी सरकारच्या भूमिकेचं समर्थन केलं आहे. कुणाल कामराने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

दरम्यान, आमदार रोहित पवार यांनीही या मुद्द्यावर भाष्य केलं. ते म्हणाले, "एकनाथ शिंदेंचं कर्तृत्व मोठं आहे. व्यंगात्मक टीका ही ठाकरेंची ताकद होती, पण आता त्यांचे कार्यकर्ते असतील तर याकडे दुर्लक्ष करायला हवं. राजीव गांधींबद्दल एका सिरीजमध्ये काही बोललं गेलं तेव्हा राहुल गांधी म्हणाले होते की त्यांचं कर्तृत्व छोटं होत नाही. कलाकार काही बोलला म्हणून त्याचं ऑफिस फोडणं चुकीचं आहे." पवार यांनी पुढे सावधगिरीचा इशारा देताना म्हटलं, "२०१४ च्या आधीचा काळ आता नाही. एखाद्या नेत्यावर बोलताना अभिव्यक्ती स्वातंत्र्य मर्यादित झालं आहे, त्यामुळे काळजी घ्यावी. व्यंगात्मक टीकेमुळे एकनाथ शिंदेंची उंची कमी होत नाही."

या प्रकरणाने राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची शक्यता आहे. पुढील घडामोडींकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## कुणाल कामराच्या सेटवर हल्ला, संजय राऊत यांचा शिंदे गटावर हल्लाबोल; फडणवीसांवरही टीकास्त्र

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे खासदार संजय राऊत यांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्या सेटवर झालेल्या तोडफोडीवरून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटावर जोरदार हल्ला चढवला आहे. शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी कुणाल कामराच्या अंधेरीतील स्टुडिओची तोडफोड केल्याच्या घटनेचा संदर्भ देत राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्याचबरोबर, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणारा प्रशांत कोरटकर याच्यावर हल्ला करण्याची हिंमत शिंदे गटात का दिसत नाही, असा सवाल उपस्थित करत त्यांनी शिंदे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.

**"कोरटकरवर हल्ला करा, महाराष्ट्र तुमच्या पाठीशी उभा राहील"**

मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले, "कुणाल कामरा हा साधा लेखक आणि पॉडकास्टर आहे. त्याच्या सेटवर हल्ले होतात, पण प्रशांत कोरटकरवर का हल्ला होत नाही? त्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. जर तुम्ही कोरटकरवर हल्ला केला, तर अख्खा महाराष्ट्र तुमच्या पाठिशी उभा राहील. त्या हल्ल्याचे आम्ही



समर्थन करू." राऊत यांनी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना आव्हान देताना म्हटले की, कोरटकर सरकारच्या डोळ्यासमोर बेपत्ता झाला आहे, पण त्याला धडा शिकवण्याची हिंमत कुणात नाही. त्यांनी या मुद्द्यावरून शिंदे गटाच्या निष्ठेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

**"फडणवीसांनी गृहखाते सोडावे, त्यांना झेपत नाही"**

संजय राऊत यांनी याच मुद्द्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीकेची झोड उठवली. ते म्हणाले, "कुणाल कामराने एक पॉडकास्ट प्रसिद्ध केला, त्यात 'ठाणे की रिक्षा'वर गाणे म्हटले. यावर धमक्या देण्याची, सेट तोडण्याची काय गरज आहे? हे महाराष्ट्राला कमजोर गृहमंत्री लाभल्याचे लक्षण आहे. देवेंद्र फडणवीस यांनी गृहखाते सोडावे.

(पान ८ वर)

## छत्रपतींचा अपमान चालतो, गद्दारांचा चालत नाही - उद्धव ठाकरे



**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबन कुणाल कामराने केल्यानंतर आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, व्यंगात्मक गाणं केलं नाही, ते सत्यात्मक गाणं केलं आहे. त्यानं जनभावना मांडल्या आहेत, आम्ही आजही बोलत आहोत. चोरी करतात ते गद्दार आहेत. काल कुणाल कामराच्या ठिकाणी केलेली तोडफोड शिवसैनिकांनी केली नाही, त्यांचा शिवसेनेशी संबंध नाही, असे ते म्हणाले. सीएम फडणवीसांच्या सुपारी घेऊन बोलतात या वक्तव्याचा सुद्धा त्यांनी समाचार घेतला. मग नागपूरची, थडग्याची सुपारी कोणी दिली? गद्दारांचं उद्दातीकरण मान्य आहे का? अशी विचारणा त्यांनी केली.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी कामराच्या स्टुडिओची तोडफोड झाल्यानंतर ती शिवसैनिकांनी केली नसल्याचे म्हणाले. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी 'एसंशिं' (एकनाथ संभाजी शिंदे) अशा नव्या शब्दाचा वापर केला. ही तोडफोड 'एसंशिं' गटाने केली असेल, गद्दार गटाच्या एकसंशिंग गटाने केली असेल, अशी टीका त्यांनी केली. छत्रपती शिवराय की गद्दारांच्या आदर्शाने राज्य चालवायचं आहे? अशी विचारणा त्यांनी केली.

त्यांनी सांगितले की, तथाकथित गद्दार नेत्याचा अपमान झाला असं वाटलं आणि तोडफोड केली. यांना शिवरायांचा अपमान करणारा कोरटकर, राहुल सोलापूरकर दिसत नाही, कोश्यारीचा निषेध दिसत नाही. हे भेकडं, हे गद्दार असल्याची जनभावना असल्याचे ते म्हणाले. न्याय सारखाच पाहिजेत, नागपुरप्रमाणे तोडफोड करणाऱ्यांवर कारवाई करून कामराच्या जागेची नुकसानभरपाई दिली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. छत्रपतींचा अपमान चालतो, गद्दारांचा चालत नाही. त्यांच्याकडून दामदुपट्टीने वसूल करावी. गद्दारांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य कसं म्हणता? असे ठाकरे म्हणाले. पोलिसांचा दरारा कमी करण्याचा प्रयत्न आहे. वाटेल ते करू शकतो हे दाखवण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

## कुणाल कामराने कोणाची माफी मागावी? -आदित्य ठाकरेंचा प्रश्न

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक कवित केल्याने त्याच्यावर आता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं नाव न घेता त्यांचा उल्लेख गद्दार असा करण्यात आल्याने शिंदेंचे समर्थक संतापले आहेत. त्यांनी रविवारी खार येथील क्लबमध्ये जाऊन तोडफोड केली. दरम्यान, याप्रकरणी आता युवानेते आदित्य ठाकरे यांनी विधान भवनात पत्रकारांशी बोलताना प्रतिक्रिया दिली. कुणाल कामराने कोणाचंही नाव घेतलेलं नसताना त्याच्यावर गुन्हा दाखल का व्हावा असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, "मला वाईट याचं वाटतं की एकनाथ शिंदेंच्याच कार्यकर्त्यांनी ठरवून दिलं की गद्दार आणि चोर म्हणजे एकनाथ शिंदेच. कारण, कुमाल कामराने नाव कोणाचंही घेतलं नव्हतं. मग त्यांना मिर्ची लागायचं कारणच नव्हतं. पण त्यांनी ठरवंलय की आपला बॉस गद्दार आणि चोर आहे."

"ज्या महाराष्ट्रात नागपूर दंगल झाली, कॉमेडी शो- गाण्याचे शो चालतात तिथे तोडफोड झाली, त्या महाराष्ट्रात गुंतवणूकदार येतील का? दोन महिन्यांपूर्वी मोदींनी कॉन्सर्ट इकॉनॉमीची चर्चा केली होती. अशी तोडफोड केल्यावर कॉन्सर्ट इकॉनॉमी येणार आहे का? मागच्याच आठवड्यात तीन तासांच्या मुलाखतीत ते म्हणाले होते की लोकशाहीत टीका टिप्पणी गरजेची असते, हे त्या विचारांना धरून चालणारे एकनाथ शिंदे आहेत का? या घटना घडल्यानंतर आपल्या राज्यात कोणीही येणार नाही", असंही आमदार आदित्य ठाकरे म्हणाले.

## विधान परिषेदत राडा, अंबादास दानवेंनी मांडलेल्या मुद्द्याला उदय सामंत यांचे आक्रमक उत्तर



**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खिल्ली उडवली. त्यांच्या विरोधात एक गाणं त्याने स्टँड अप कॉमेडी शोमध्ये गायलं. ज्यानंतर मुंबई तो ज्या स्टुडिओत आला होता त्या स्टुडिओची शिवसैनिकांनी तोडफोड केली. आज अधिवेशनातही हा मुद्दा गाजला. अंबादास दानवेंनी मांडलेल्या मुद्द्याला उदय सामंत यांनी उत्तर दिलं.

"सभापती महोदय, मुंबईत एक घटना घडली. पोलीस अधिकारी उपस्थित असताना स्टुडिओवर काही लोकांनी हल्ला केला. मंगळवार आणि बुधवारी आपण संविधानावर चर्चा करणार आहोत. चर्चा करताना मुलभूत अधिकार, नागरिकांची कर्तव्यं. असं असताना कुणाल कामराने विडंबन कविता सादर केली. कॉमेडियन अशा गोष्टी सादर करत असतात. अशात सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तोडफोड केली. या कार्यकर्त्यांनी सोलापूरकर, कोरटकर यांच्यावर काही भाष्य केलं नाही." असं अंबादास दानवे यांनी म्हणताच सभागृहात गदारोळ सुरु झाला. दानवे पुढे म्हणाले म्हणाले, "छत्रपती शिवरायांचा अपमान करणारे लोक कोरटकर आणि सोलापूरकर आहेत. तरीही एका कॉमेडियनचा निषेध नोंदवला जातो, पोलिसांच्या उपस्थिती तोडफोड झाली.

राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात कॉमेडियनने माफी मागितली पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार सरकार हिरावून घेतं आहे का? राज्याचे मुख्यमंत्र्यांनी गुन्हेगारांवर कारवाई केली पाहिजे. अशा पद्धतीने सत्ताधारी पक्षाचेच लोक तोडफोड करतात. कोरटकर, सोलापूरकर बाबत हे शांत का बसले आहेत? मला वाटतं कायदा आणि सुव्यवस्था सत्ताधारी पक्ष बिघडवत आहेत. तोडफोड करणाऱ्या सगळ्यांनाच अटक झाली पाहिजे. अशी मागणी अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे.

विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा मांडला तो मांडून विषयाला भलतीकडेच नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. ज्या व्यक्तीचं समर्थन करत आहेत ती व्यक्ती कशी आहे? याचं ब्रिफिंग घ्यायला हवं होतं. पण आदेश आल्यामुळे, सांगितलं गेल्यामुळे विरोधी पक्षनेते असं बोलत असतील.

(पान ८ वर)

## मुस्लीम आरक्षणाच्या मुद्द्यावरुन संसदेत प्रचंड गदारोळ, नड्डा-खरगे यांच्यात जोरदार खडाजंगी

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

राज्यसभेत सोमवारी कर्नाटक सरकारच्या मुस्लिम आरक्षणावरुन बराच गदारोळ झाला. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी कर्नाटक सरकारने मुस्लिम आरक्षण देण्याचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी सभागृह नेते जेपी नड्डा यांनी हे आरक्षण घटनेच्या तत्त्वांचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. तर, याला प्रत्युत्तर देताना विरोधी पक्षनेते खरगे यांनी, आरक्षण कोणीही रद्द करू शकत नाही, असे ठणकावून सांगितले.

राज्यसभेचे कामकाज सुरू होताच संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी कर्नाटक सरकारच्या मुस्लिम आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. गरज भासल्यास राज्यघटना बदलण्यासही तयार असल्याचे काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी म्हटले होते, असा आरोप त्यांनी केला. हे विधान एखाद्या सामान्य व्यक्तीकडून आले असते, तर त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले असते, पण



घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीचे हे विधान अत्यंत चिंताजनक आहे, असेही रिजिजू म्हणाले.

काँग्रेसवर निशाणा साधत रिजिजू म्हणाले की, विरोधक बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो गळ्यात घालून फिरतात, पण आता ते संविधान बदलण्याची भाषा करत आहेत. संविधान बदलून मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याची काय योजना आहे? असा सवाल त्यांनी काँग्रेसला केला. यावर राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी या आरोपाचे खंडन करत काँग्रेसचा संविधानाशी छेडछाड करण्याचा कोणताही हेतू नसल्याचे स्पष्ट केले. भाजप नेते जेपी नड्डा यांनी कर्नाटक सरकारच्या मुस्लीम आरक्षणावर वक्तव्य करताना हे संविधानाच्या तत्त्वांचे उल्लंघन असल्याचे म्हटले. ते म्हणाले की, धर्माच्या आधारावर आरक्षण मिळणार नाही, असे बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टपणे सांगितले होते. काँग्रेस संविधान रक्षणाचा ढोल बडवते, पण आता तोच पक्ष संविधान बदलण्याची भाषा करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या आरोपाचे खंडन करत भारताची राज्यघटना वाचवण्याचे काम केवळ काँग्रेसनेच केल्याचे म्हटले. राज्यघटना बदलण्याची कोणतीही शक्यता नसून या सर्व अफवा पसरवण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

## महात्मा फुले, सावित्रीबाईंना 'भारतरत्न' देण्याचा ठराव ऐतिहासिक: अजित पवार

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेने क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना देशाचा सर्वोच्च 'भारतरत्न' पुरस्कार देण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला आहे. हा ठराव ऐतिहासिक असून, पुरोगामी महाराष्ट्राच्या लौकीकात भर घालणारा आणि 'भारतरत्न' पुरस्काराचा गौरव वाढवणारा असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. त्यांनी या ठरावाला सर्वानुमते मंजुरी मिळवण्यासाठी सहकार्य करणाऱ्या विधिमंडळ सदस्यांचेही आभार मानले.



अजित पवार म्हणाले, "महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्रीशक्तीला शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज महिला शेती, शिक्षण, विज्ञान, संशोधन, अंतराळ, राजकारण आणि समाजकारणात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. देशाच्या विकासात त्यांचे योगदान आहे, याचे संपूर्ण श्रेय या दांपत्याच्या कष्टाला जाते." त्यांनी पुढे सांगितले की, समाजातील दुर्बल, वंचित आणि बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे अलौकिक कार्य फुले दांपत्याने केले. "त्यामुळे शेतकरी, कष्टकरी आणि देशवासियांना ते कायम 'महात्मा' राहतील. हा ठराव लोकभावनेचा आदर करणारा आणि 'भारतरत्न'चा मान वाढवणारा आहे," असे त्यांनी नमूद केले.

या ठरावामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणावादी इतिहासाला पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे. फुले दांपत्याच्या कार्याचा गौरव करणारा हा निर्णय केंद्र सरकारकडून स्वीकारला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अजित पवार यांच्या या वक्तव्याने राज्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत.

## प्रशांत कोरटकरच्या मुसक्या आवळल्या



**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

शिवरायांचा अपमान करणाऱ्या तसेच इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरला तेलंगणातून अटक झाल्याची माहिती आहे. गृहविभागातील सूत्रांनी याची माहिती दिली आहे. प्रशांत कोरटकरने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. पण न्यायालयाने तो फेटाळला आहे.

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्यानंतर प्रशांत कोरटकर हा 25 फेब्रुवारीपासून फरार होता. त्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. नागपुरातून फरार झालेला कोरटकर हा चंद्रपूरमध्ये लपून बसला होता. कोल्हापूर पोलिस त्याला अटक करण्यासाठी गेले असता त्या ठिकाणाहूनही तो फरार झाला होता.

(पान ८ वर)

## आरएसएस देशातील शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करतेय - राहुल गांधींची घणाघाती टीका

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सोमवारी INDIA आघाडीच्या विद्यार्थी संघटनांच्या निदर्शनात सामील होण्यासाठी जंतरमंतरवर पोहोचले. यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार निशाणा साधला. 'आरएसएस शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याच्या विचारात आहे,' अशी घणाघाती टीका त्यांनी केली.



राहुल गांधी पुढे म्हणतात, 'आरएसएस शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याच्या विचारात आहे. आज भारतातील सर्व केंद्रीय विद्यापीठांमध्ये आरएसएसचे कुलगुरू आहेत. लवकरच राज्यांतील विद्यापीठांचे कुलगुरूही आरएसएसचे असतील. यंत्रणा त्यांच्या हातात पडली तर सर्व काही संपेल. देशातील सर्वात मोठी समस्या बेरोजगारी आहे. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान कुंभमेळ्यावर बोलले होते. कुंभमेळ्यावर बोलणे चांगले आहे, पण त्यांनी भविष्याबद्दलही बोलले पाहिजे. त्यांनी बेरोजगारीविरुद्ध बोलावे. तुमच्या सरकारने या देशातील तरुणांना बेरोजगार केले, तुम्ही त्याबद्दल बोलले पाहिजे.'

'देशात आज कोणालाही रोजगार मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या हिताशी आम्ही तडजोड करणार नाही. आपण सर्वांनी मिळून सरकारचा सामना केला पाहिजे. पंतप्रधान मोदींनी बेरोजगारी, महागाई आणि शिक्षण व्यवस्थेवर बोलले पाहिजे. पण त्यांची यंत्रणा अंबानी-अदानी यांच्यासाठी आहे. इंडिया आघाडी या नात्याने आमच्यात विचारधारेचे काही मतभेद असू शकतात पण आमचे उद्दिष्ट एकच आहे. आम्ही आरएसएस आणि त्याची विचारधारा नष्ट करण्यासाठी काम करू,' असा निर्धार राहुल गांधींनी बोलून दाखवला.

# स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी घटकाचे आरक्षण कमी होऊ देणार नाही

## ओबीसी मेळाव्यात छगन भुजबळ यांचा निर्धार

**जळगाव ।** आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये होणाऱ्या निवडणुकीत ओबीसींचे आरक्षण कमी होत आहे. त्यामुळे आरक्षणाची लढाई संपलेली नाही. आम्ही शेवटपर्यंत लढू आणि ओबीसी घटकाचे आरक्षण कमी होऊ देणार नाही, असे ठाम मत राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद जळगाव येथे ओबीसी महामेळाव्यात ते बोलत होते. यावेळी आ. राजू भोळे, समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापू भुजबळ, उपाध्यक्ष ईश्वर बालबुधे, बाळासाहेब कर्डक, सुभाष राऊत, सत्संग मुंढे, कल्याण दळे, मुकुंद सपकाळ, दिवाकर गमे, अनिल निकम, वसंत पाटील, विजय महाजन, शंकरराव लिंगे, अनिल महाजन, सतीश महाजन, शाळीग्राम मालकर यांच्यासह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. यावेळी ते म्हणाले, अ. भा. महात्मा फुले समता परिषद ही केवळ एक समाजाची नसून ती समाजातील सर्वच घटकाची आहे. समता परिषदेमध्ये माळी, दलित, तेली, चांभार, कुंभार, मुस्लिम सर्वच समाजाचे प्रतिनिधी यात आहेत. अनेकांना वाटत असेल की मंत्रिपदासाठी हा मेळावा घेतला जातो आहे; मात्र सामाजिक काम जो हाती घेतो त्याला त्रास सहन करावाच लागतो. ओबीसी समाज ५४ टक्के आहे मात्र तो फार मागास राहिला आहे. याच ओबीसींच्या मुद्द्यावर आपण महाराष्ट्रात प्रचंड मेळावे आपण घेतले आहेत. दिल्लीत मेळावे घेतले आहे. रामलीला मैदानावर देखील आपण मेळावे घेतले. बीडमध्ये ज्यावेळी हॉटेल, घर




जाळण्यात आली, घरांवर हल्ले झाले, जयदत्त क्षीरसागर, प्रकाश सोळंके यांचे घर जाळले. सगळ्याची राख रांगोळी केली होती त्यानंतर मी ठरवले आता शांत बसणार नाही त्यानंतर सर्वात अगोदर मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि मग अंबड ला पहिली सभा घेतली. त्यामुळे मला मंत्रिपदाची चिंता नाही.

पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्राला देशभरात पुरोगामी राज्य म्हणून ओळखलं जातं. महाराष्ट्राच्या पुरोगामीत्वाचा पाया क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी रचला. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक चळवळीत तात्यासाहेब भिडे, अण्णासाहेब चिपळूणकर, सदाशिव गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, भवाळकर, परांजपे आदी सहकारी सहभागी होते. सावित्रीबाईंना फातिमा शेख, गणू शिवाजी मांग व धुराजी आप्पाजी चांभार या शिक्षकांनी सहकार्य केले.

महात्मा फुले यांनी २४ नोव्हेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सावित्रीबाई फुले यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार देखील या वर्षापासुन सुरु करण्यात आला आहे. प्रत्येक वर्षी ३ जानेवारीला नायगावला याचे वितरण करण्यात येईल. सध्या महात्मा फुले यांना भारतरत्न द्या अशी मागणी होत आहे. माझा विरोध नाही मात्र भारतरत्न पेक्षा महात्मा ही पदवी सगळ्यांत मोठी आहे त्यामुळे आम्हाला महात्मा हीच मोठी पदवी आहे. गेल्या काही वर्षात आपण अनेक कार्य मार्गी लावले आहे.



लहूजी वस्ताद साळवे आणि रानाबा महार हे त्यांच्या पाठीशी हिमतीने उभे राहिले. आपल्या कार्यासाठी एक व्यापक संस्था असावी यासाठी

आपल्याला महाराष्ट्र पुढे घेऊन जायचे असेल तर महाराष्ट्रात सर्व घटकाला सोबत घेतले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सोबत देखील सर्व घटकाचे मावळे होते. अगदी मुस्लिम देखील मावळे होते. अलूतेदार, बलुतेदार आणि सर्व घटकाचे मावळे छत्रपती शिवाजी महाराजांसोबत होते. पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्रात सध्या चिंता वाटावी अशी परिस्थिती आहे.

विशेषतः मराठवाड्यात मारहाणीचे अनेक प्रकार घडत आहेत. बीड मध्ये घडलेले देशमुख प्रकरण घडले आम्ही सगळ्यांनी निषेध केला. माणूस मारत असाल तर आम्ही सर्वच त्याचे विरोध करणार. हा यंत्रांचा, तंत्रांचा, मंत्राचा महाराष्ट्र आपण म्हणतो महापुरुषांचा, संत परंपरेचा हा महाराष्ट्र आहे. क्रूरपणा महाराष्ट्रात या अगोदर नव्हता. हा महाराष्ट्र संताचा, एक सुसंकृत परंपरेचा आहे तो आपल्याला टिकवावा लागेल जिथे अन्याय होत असेल. तिथे जाऊन आपण आवाज उठविला पाहिजे, असेही ये म्हणाले.

### बांठिया आयोगाच्या रिपोर्टला विरोध

महाराष्ट्रात आगामी काळात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यात बांठिया आयोगाने दिलेला रिपोर्ट प्रमाणे आरक्षण लागू होईल आमचा त्या रिपोर्टलाच विरोध आहे. त्यात ओबीसी घटकाची संख्या कमी दाखवण्यात आली आहे. ज्या गावचा सरपंच ओबीसी आहे त्या गावात एकही ओबीसी नाही असा रिपोर्ट बांठीया कमिशनने दिला आहे. त्यामुळे हा रिपोर्ट म्हणाला मान्य नाही. ओबीसीचे आरक्षण कमी होता कामा नये.

## ➤ महत्त्वाचे

### पाण्याच्या बादलीत बुडून अंबडला बालिकेचा मृत्यू



**नाशिक ।** बादलीतील पाणी खेळतांना त्यात पडून बुडल्याने चार वर्षीय बालिकेचा अंत झाला. रागनी मनोजकुमार वनवासी (रा. सुपरनेल इंडस्ट्रिअल, ग्लॅस्को बसस्टॅन्डसमोर, एमआयडीसी अंबड, नाशिक) असे मृत बालिकेचे नाव आहे. ही घटना शनिवारी (दि. २२) दुपारी एक वाजता सुपरनेल कंपनीच्या आवारात घडली. रागनीचे आई वडील हे कुटुंबासह कंपनीत वास्तव्यास असून शनिवारी तिचे आई वडील नियमित कामकाज करत होते. त्याचवेळी आंघोळीसाठी असलेल्या जागेवरील एका मोठ्या बादलीत रागनी पाणी खेळत होती. त्याचवेळी तिचा तोल गेल्याने ती बादलीत पडली. ती ओरडू लागली असताना तिचे नाक व तोंड बादलीत अडरकल्याने तिचा श्वास गुदमरला व बादलीतील पाणी तिच्या नाकातोंडात गेले. त्यामुळे ती बेशुद्ध झाली. तिच्या कुटुंबाने तिची शोधाशोध केली असता, रागनी पाण्याच्या बादलीत पडल्याचे दिसून आले. तत्काळ तिला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉ. घुटे यांनी तपासून मृत घोषित केले. या घटनेने अंबड परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### माध्यमिक विद्यालयात शहीद दिन उत्साहात

**एकलहरे ।** नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालय, उंटवाडी येथे संस्था उपाध्यक्ष तथा शालेय समिती अध्यक्ष चंद्रशेखर मोंढे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मुख्याध्यापक राजेंद्र कापसे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहीद दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी उपमुख्याध्यापक रविंद्र हात्ते, पर्यवेक्षक सूर्यभान जगताप, पर्यवेक्षिका मनिषा देशपांडे, बाळासाहेब आहेर, ज्येष्ठ शिक्षक दिलीप पवार, सुनंदा कुलकर्णी, प्रिया कुलकर्णी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन इ 7 वी क च्या वर्गाने केले. त्यांना सहकार्य वर्गशिक्षिका राधिका देवस्थळी यांनी केले. शालेय विद्यार्थीनी पल्लवी शिंदे, पल्लवी हळदे यांनी शहीद दिनाची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.संस्था उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, मुख्याध्यापक राजेंद्र कापसे, पर्यवेक्षक सूर्यभान जगताप, शिक्षिका शहीद दिनाचे महत्त्व सांगितले व शहीदांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वराली जोरवर यांनी केले.

### सफाई कामगार गेहलोत यांच्या कुटुंबियांना न्याय मिळावा

**नाशिक ।** सफाई कामगाराला जिवंत जाळून मारणाऱ्या आरोपीस फाशीची शिक्षा देऊन त्यांच्या कुटुंबियांना एस.टी महामंडळामध्ये नोकरी देऊन आर्थिक मोबदला देण्यात यावा, अशा मागणीचे



निवेदन संघर्ष समितीने निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना दिले. निवेदनात म्हटले आहे की, ठक्कर बाजार सी.बी.एस येथे एस.टी महामंडळाचे सुलभ शौचालय आहे. सदर शौचालायावर बाल्मिकी समाजाचे विजय इलमचंद गेहलोत हे सफाई कामगार म्हणून काम करीत होते. या परिसरामध्ये चोऱ्या माऱ्या करणे, लोकांना त्रास देणे, लोकांना धमक्या देणे,लूटमार करणे, मारहाण करणे असे कृत्य गुंड प्रवृत्तीची व्यक्ती करत होती. ती व्यक्ती या सुलभ शौचालयामध्ये जाऊन गल्ल्यामधील पैसे काढून घेणे, दारू पिऊन तिथे धिंगाणा घालणे असे कृत्य करीत असल्याने सुलभ शौचालयाची देखभाल करणारे विजय गेहलोत यांनी त्यास रोखले असता त्यांच्याबद्दल मनात खुन्नस ठेऊन त्यांना शिवीगाळ मारहाण करत असे. याबाबत पोलिसांना कल्पना असतानाही याकडे दुर्लक्ष केले गेले. परिणामी दि. 21 मार्च रोजी हा इसम सुलभ शौचालयावर येऊन एका प्लास्टिकच्या पिशवीमध्ये पेट्रोल घेऊन येऊन ती पिशवी हॅप्पी होली म्हणून त्याच्या अंगावर टाकली आणि लायटरणे पेटवून दिले. यात विजय गेहलोत 60% भाजले. त्यामुळे त्यांची प्रकृती गंभीर झाली होती. अखेर त्यांचे सोमवारी (दि.२४) सकाळी त्यांचे दुःखद निधन झाले. प्रशासनाचा व पोलिसाच्या हलगर्जीपणामुळे एका गरीब दलित सफाई कामगाराला नाहक आपला जीव गमवावा लागला आहे. विजय गेहलोत यांच्या मागे पत्नी व तीन लहान मुली आहेत. त्यांच्या घरातील कर्ता पुरुष गेल्यामुळे त्यांच्या संसार उघड्यावर पडलेला आहे. म्हणून त्यांच्या मुलीला एस.टी महामंडळामध्ये किंवा शासकीय नोकरीमध्ये त्वरित सामावून घेणे गरजेचे आहे. तसेच त्यांना शासकीय आर्थिक मदत म्हणून 5 लाख रुपये देणे गरजेचे आहे. त्यांच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या आरोपीस कठोर शासन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर घटनेमुळे सफाई कामगारांमध्ये बाल्मिकी, मेघवाळ, मेहतर समाजामध्ये तीव्र असंतोष पसरून या समाजामध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे. त्याच्या निषेधार्थ बाल्मिकी, मेघवाळ, मेहतर समाज संघर्ष समितीतर्फे हे निवेदन देण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. या प्रसंगी संघर्ष समिती व सफाई कामगारांचे नेते सुरेश मारू, रणजित कल्याणी, रमेश मकवाना आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुक्मा पवार-गडाख यांना इंटिरियर डिझायनर क्षेत्रातील पुरस्कार जाहीर




**सिन्नर ।** आपल्या कलेच्या जोरावर नावलौकिक मिळवणाऱ्या रुक्मा पवार गडाख यांचा नुकताच मोठा सन्मान करण्यात आला. सिन्नरच्या सोनांबे येथील मातीतून आपल्या कष्टाने पुढे आलेले सुप्रसिद्ध नाक, कान, घसा तज्ञ डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्या स्नुषा आणि उद्योजक शेखर पवार यांची पत्नी असलेल्या रुक्मा पवार या एक कुशल आणि नावीन्यपूर्ण विचारसरणी असलेल्या इंटिरियर डिझायनर आहेत.

सध्या त्या नाशिक, पुणे, ठाणे आणि अहिल्यानगर येथे अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर काम करत आहेत. जागेचा कल्पक आणि प्रभावी उपयोग करण्याची हातोटी, डिझाईनमधील नाविन्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उत्तम वापर करण्याच्या त्यांच्या कौशल्यामुळे त्या इंटिरियर डिझाईन क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण करत आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीची दखल घेत, त्यांना `30 अंडर 30 रायजिंग अँड क्रिएटिव्ह इंटिरियर डिझायनर ऑफ द इयर 2025` हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांची इंटिरियर डिझाईन फर्म `स्टुडिओ झिंग` ही नाविन्यपूर्ण आणि दर्जेदार डिझाईन्समुळे वेगाने पुढे जात आहे. त्यांच्या फर्मला `ट्रेंडसेटर अँड प्रॉमिसिंग इंटिरियर डिझाईन फर्म ऑफ द इयर 2025` हा बहुमान मिळाला आहे.

या पुरस्कारांमुळे केवळ रुक्मा पवार यांचा गौरव झालेला नाही, तर संपूर्ण सिन्नर आणि महाराष्ट्राचा अभिमान वाढला आहे. या क्षेत्रात त्यांनी मिळवलेले यश हे मेहनत, समर्पण आणि उत्कृष्ट डिझाईन कौशल्याचा संगम आहे. त्यांना मिळालेल्या या गौरवाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## विहीर खचली, ढिगाऱ्याखाली अडकून दोन मजूर जागीच ठार



**एकलहरे ।** रिसोड तालुक्यातील मोठेगाव शेतशिवारात विहिरीचे खोदकाम सुरू असताना अचानक विहीर कोसळल्याने मलब्याखाली दबून दोन मजूर ठार, तर एक गंभीररित्या जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली. यामध्ये प्रल्हाद उकंडी देवकर एकलासपुर, प्रकाश रावसाहेब देशमुख रा. मोठेगाव, असे मयतांचे मजुरांची नावे आहेत, तर तुळशीराम इंगोले बाळखेड, हे गंभीर रित्या जखमी झाले आहेत. दरम्यान, प्रशासनाने घटनास्थळी दाखल होत जेसीबी`च्या साहाय्याने मजुरांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्नही केले. मात्र तोपर्यंतखूप उशीर झाला होता. या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.

## सीटूतर्फे जनसुरक्षा बिल, चार श्रमसंहिता लागू करण्याच्या निर्णयाविरोधात निदर्शने, होळी



**नाशिकरोड ।** केंद्र सरकारच्या धरतीवर राज्य सरकारने जनसुरक्षा बिल व २९ कामगार कायदे रद्द करून, नवीन चार लेबर कोड बिल विधानसभेत बहुमताचे जोरावर मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे कामगार, कष्टकरी वर्ग देशोधडीला लागणार आहे.त्यमुळे कामगार व जनविरोधी बिल सरकारने लागु करू नये. तसेच कामगार विरोधी व कार्पोरेट धार्जिण्या चार श्रमसंहिता मागे घेऊन. कामगाराच्या बाजुचे कायदे करुन त्याची कडक अंमल बजावणी करावे. यासाठी सिटीच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात कामगार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक शिक्षेची कारवाई करावी, लोकशाही व स्वातंत्र्यावर हल्ला करणारे महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक मागे घ्यावे. सर्व कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षेची हमी, स्थानिक पातळीवर लैंगिक छळ विरोधी तक्रार निवारण समित्यांचे गठण करावे. अशा सर्व मागण्या करण्यात आल्या. यावेळी आंदोलनकर्त्यांनी राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.या आंदोलनाप्रसंगी कामगार नेते सीटु सेक्रेटरी कॉ. हिरामण तेलोरे, प्रकाश चौधरी, स्वरूप बाबा वाघ, शिवाजी फलके, राहुल गायकवाड, किशोर गांगुर्डे, संदीप गुंजाळ, अंकुश धिंदळे, सखाराम साठे, गोरख राजोळे, संपत पवळे, विनोद आहिरे, विजय जावळे, विजय राजोळे, विजय गांगुर्डे आदिंसह कामगार बांधव निदर्शनास उपस्थित होते.

## सातत्याच्या प्रयत्नांना यश, कांदा निर्यातीवरील २०% शुल्क हटवण्याचा केंद्राचा ऐतिहासिक निर्णय!

**(राम सुरसे यांजकडून)**

कांदा स्वयंपाकघरात जसा महत्त्वाचा, तसाच राजकारणासाठीही महत्त्वपूर्णच आहे. राज्य आणि देशातील राज्यकर्त्यांच्या चढ-उतारातही कांदा तेवढीच महत्त्वाची भूमिका बजावतो. कांदा हा नुसताच खाण्यासाठी उपयोगाचा नाही, तर कांदा हा केंद्रातील सरकार पाडण्यासाठी आणि सरकार पुन्हा स्थापन करण्यासाठी महत्त्वाचा घटक ठरला आहे. शेतकऱ्यांचा हाच कांदा त्यांचा भाव वाढला तर कांदा उत्पादक शेतकरी पंतप्रधान व केंद्रीय कृषिमंत्री व राज्यातील मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांची वाहवा करतो. व कांदा भाव पडले तर हाच शेतकरी त्यांना वाखोली वाहतो. असा हा कांदा महाराष्ट्र राज्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न करून देणारे महत्त्वाचे पीक आहे. गत काही दिवसापासून कांदा पिकाचे ढासळणाऱ्या बाजारभावाने शेतकरी मोठ्या विवंचनेत आलेला होता. त्यासाठी केंद्र शासनाने लादलेले निर्यातमूल्य कमी करणे खूप गरजेचे होते.म्हणून महाराष्ट्रातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी अतिशय आनंदाची बातमी असून केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील २०% शुल्क हटवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. हा निर्णय १ एप्रिल २०२५ पासून लागू होणार आहे. केंद्र सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत नवी संधी उपलब्ध होईल आणि त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.



कांदा निर्यातबंदीच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील होतो. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांच्यासोबत सातत्याने पाठपुरावा केला आणि हा मुद्दा ठामपणे मांडला तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही यावर चर्चा केली.केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या नाशिक दौऱ्या दरम्यान या विषयावर सखोल आणि सकारात्मक चर्चा केली होती. त्यावेळी शेतकऱ्यांच्या अडचणी स्पष्टपणे मांडल्या आणि कांदा निर्यात शुल्क हटवण्याची गरज अधोरेखित केली. या ठोस संवादाचा सकारात्मक परिणाम आता दिसून येत असून, केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळेल. याचा मला मनःपूर्वक आनंद आणि समाधान आहे. भविष्यातही शेतकऱ्यांच्या हितासाठी मी कायम कटिबद्ध राहीन. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे मनःपूर्वक आभार !

**– ना. कृषी मंत्री श्री माणिकराव कोकाटे**

> महत्त्वाचे

## माया रुंग्ठा यांचा 'इन्स्पायरिंग वूमन' पुरस्काराने सन्मान



**नाशिक ।** ललित रुंगटा ग्रुपच्या संचालिका माया रुंगटा यांना 'इन्स्पायरिंग वूमन २०२५' या प्रतिष्ठित पुरस्काराने मुंबई येथील ताज प्रेसिडेंट हॉटेलमध्येअमृता फडणवीस यांच्या हस्ते नुकताच पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.दूरदृष्टी आणि उद्योग क्षेत्रातील अतुलनीय योगदाना बद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला आहे.इंटिरिअर डिझायनर यशस्वी उद्योजिका आणि ललित रुंगटा ग्रुपच्या अभूतपूर्व यशामागील प्रेरक शक्ती म्हणून माया रुंगटा यांनी नावीन्य,सर्जनशीलता चिकाटीचा उत्कृष्ट नमुना सादर केला.त्यांच्या नेतृत्वा खाली ललित रुंगटा ग्रुपने नाशिकच्या 'रिअल इस्टेट' मध्ये मोठी क्रांती घडवली आहे.

## 'गांधीतीर्थ स्वच्छ शाळा' स्पर्धेसाठी मविप्रची शाळा ठरली पात्र

**नाशिक ।** जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनच्या वतीने आयोजित गांधीतीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या राज्यभरातील ४६ शाळांमध्ये नाशिक जिल्ह्यातील वणी येथील मविप्र संचलित आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलची अंतिम फेरीत निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, संचालक प्रवीण जाधव व सर्व संचालक, शिक्षणाधिकारी प्रा. शिंदे यांनी स्वागत केले आहे. वर्षभर स्वच्छतेचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे धडे गिरवावे, महात्मा गांधींचे विचार विद्यार्थ्यांनी अंगीकारावेत, ही या स्पर्धेची मुख्य उद्दिष्टे आहेत. त्यासाठी गांधी रिसर्च फाउंडेशनमार्फत सर्व शाळांना भेट देऊन पाहणीअंती सदस्यांकडून शाळेला मूल्यांकन दिले जाते.

## वेद विद्या प्रतिष्ठानतर्फे मनपा आयुक्तांचा सन्मान

**नाशिक ।** महर्षी गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठान या निवासी गुरुकुल व नाशिकस्थित केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयातर्फे वैदिक सम्राट स्वर्गीय श्रीकृष्ण शास्त्री गोडशे गुरुजी यांच्या जन्म शताब्दी निमित्त अखिल भारतीय शास्त्र महासभा नुकतीच लेउवा पाटीदार समाज ट्रस्टच्या कार्यालयात झाली. शास्त्रार्थ सभेच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी जिल्हा शर्मा उपस्थिती होते; मात्र नाशिक महापालिकेचे आयुक्त मनीषा खत्री उपस्थित राहू शकल्या नाही. रविवारी त्यांच्या कार्यालयात जाऊन या कार्यक्रमानिमित्त त्यांचा संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मनपा आयुक्त मनीषा खत्री यांना स्मृतिचिन्ह देऊन महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठानचे प्रधानाचार्य वीरमूर्ति रवींद्र पैठणी गुरुजी आणि केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय नाशिकचे संचालक डॉ. गोविंदा पांडे यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्कृत भाषा आणि वेदविद्या अभ्यासाचे कार्य या विषयावर चर्चा झाली.

## सीएनजी पंपावर वाहनांच्या रांगा

**नाशिक ।** नाशिकमध्ये सीएनजी वाहनांची संख्या मोठ्या संख्येने वाढत आहे. सद्यस्थितीत एक लाखाहून अधिक किलो सीएनजी गॅस वाहनांसाठी पुरवला जात आहे. नाशिक जिल्ह्यात 53 सीएनजी पंप आहेत. अजूनही नवीन सीएनजी-पंप येऊ घातले आहेत; मात्र तरीही पंपावर वाहनांच्या रांगा कायम दिसत आहे. ऑनलाइन व ऑफलाइन या दोन प्रकारे सीएनजीचे वितरण होते. एमएनएलजीचे स्वतःचे हे पंप आहे. तेथे 24 तास सीएनजी उपलब्ध आहे; मात्र जे खासगी पंप आहेत त्यांना मात्र विशिष्ट मर्यादेपर्यंतच गॅस उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे नागरिकांच्या वाहनांची गर्दी नियमितपणे दिसते. सीएनजीसाठी आवश्यक तेवढे पंप नसतानाही या कारची खरेदी नागरिक करत आहे. त्यामुळे वाहनचालकांना आपली वाहने पंपावर जाऊन ठेवावी लागतात. महाराष्ट्र सरकारने वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी कर सवलत दिली होती. त्यामुळे सीएनजी विक्रीत वाढ झाली इलेक्ट्रिक व सीएनजी वाहने तीस लाख रुपयांचे अधिक किमतीचे आहेत. त्यांच्यावरच करवाढ करण्यात आली आहे.

## मुक्त विद्यापीठाच्या 'यशवाणी' वेब रेडीओवर शैक्षणिक व्याख्यान

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'यशवाणी' या वेबरेडीओवर सुप्रसिद्ध मानसशास्त्र अभ्यासक प्रा. दत्तात्रय तापकीर यांचे 'ज्ञानरंगात रंगतो शिक्षक राजा' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून व विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने सुरु झालेल्या ऑनलाईन व्याख्यानमालेतील हे तिसरे पुष्प होते. व्याख्यानात प्रा. तापकीर यांनी उदाहरणे देत शिक्षकांची विविध गटात वर्गवारी केली. शिक्षकांनी आपल्या कामास कार्यभार न मानता त्यास कार्यानंद मानले पाहिजे. शिक्षकाने आपल्या ज्ञान कक्षा उंचावण्यासाठी सतत श्रवण, वाचन, मनन, चिंतन, लेखन केले पाहिजे. विविध कला – साहित्याची त्यास माहिती व आवड असली पाहिजे. एकूणच शिक्षक हा विद्यार्थ्यास ज्ञानरंगात रंगलेला राजा वाटला पाहिजे असे प्रा. तापकीर आपल्या व्याख्यानाच्या अखेरीस म्हणाले.


# धक्कादायक : तहसीलदाराचा गलथान कारभार

## मृत व्यक्तीचे नाव सहकारी संस्थेच्या मालकी हक्कात

**नाशिक ।** नाशिक तहसीलदार कार्यालयात सुमारे पाच वर्षांपूर्वी दाखल असलेल्या एका प्रकरणात कुठलीही शहानिशा न करता तहसीलदारांनी दिलेल्या एका आदेशामुळे मृत व्यक्तीचे नाव एका आदिवासी सहकारी संस्थेच्या मालकी सदरात लागल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सन २०२१ मध्ये दाखल असलेल्या प्रकरणात तब्बल पाच वर्षांनंतर निकाल दिल्याने या प्रकरणी संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, तहसीलदारांच्या आदेशाने मृत व्यक्तीचे नाव मिळकतीच्या मालकी सदरात लागल्याने संस्थेचे सभासद अक्षरशः हवालदिल झाले आहेत. या प्रकरणांमध्ये काही बिल्डर आणि भूमाफियांची टोळी सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. भोलेनाथ आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे पाथर्डी शिवारातील सर्वे नंबर २०५/२ या मिळकतीवर तब्बल ३४ भूखंड आहेत. या मिळकतीच्या सातबारा सदरात मालकी हक्क कब्जा वहिवाट ही सदर संस्थेचीच आहे. सभासदांच्या एकत्रितरीत्या जमा केलेल्या रकमेतून सदर मिळकत खरेदी करण्यात आली आहे. त्याकरिता भाग भांडवल हे सहभाग धारकांनीच निर्माण केले. असे असताना काही भूमाफियांनी षडयंत्र रचत मिळकतीच्या सातबारा वरून संस्थेचे नाव कमी करून त्या ऐवजी माधव सखाराम डामसे या व्यक्तीचे नाव मालकी सदरात लावण्यासाठी दिनांक २४ ऑगस्ट २०२१ रोजी तहसीलदार कार्यालयात अर्ज दाखल केला. या अर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार आणि तालुका उपनिबंधक कार्यालयात अनेक पत्रव्यवहार झाले. त्यामध्ये या संस्थेविषयी वेगवेगळे आदेश पारित करण्यात आले.

सध्या भूमाफियांनी डोके वर काढले असून त्यामुळे शहरात अनेक गैरप्रकार घडत आहेत. भूमाफियांकडून शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून वेगवेगळ्या आदेश काढले जात असून, या भूमाफियांमुळे सर्वसामान्यांची डोकेदुखी वाढली आहे. पोलीस यंत्रणा दिवाणी प्रकरण म्हणून याबाबत कारवाई करण्यास टाळाटाळ करत आहेत. मात्र शासकीय अधिकारी कुणालाही नजुमानता भूमाफियांना फायद्याचे निर्णय घेत आहेत. त्यामुळे ही गंभीर बाब असून वरिष्ठ स्तरावरून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

या सर्वच घडामोडी होत असताना अचानक या प्रकरणाविषयीच्या हालचाली शांत झाल्यात. मात्र अलीकडच्या काळात या प्रकरणामागे काही बिल्डर आणि भूमाफिया सक्रिय असल्याचे निष्पन्न झाले. या सर्व घडामोडींवर संबंधित संस्थेच्या सभासदांनी बारकाईने नजर ठेवली. त्यानंतर अचानक सातबारा उतारावरील संस्थेचे नाव कमी होऊन त्या ठिकाणी माधव सखाराम डामसे या नावाची नोंद झाल्याचे सभासदांच्या निदर्शनास आले. अधिक चौकशी केली असता पाच वर्षांपूर्वी दाखल असलेल्या प्रकरणात शासकीय अधिकाऱ्यांना अचानक जाग आल्याने विद्यमान तहसीलदारांनी ७ ऑगस्ट २०२४ रोजी माधव डामसे यांचे नाव लावण्याचे आदेश पारित केले.




> दाखल प्रकरणामध्ये एखाद्या व्यक्तीची ओळख पटविणे अवघड असते. या प्रकरणात मंडल अधिकाऱ्यांकडून संपूर्ण चौकशी झाल्यानंतर आदेश करण्यात आले मात्र संबंधित व्यक्ती मृत असल्याचे लक्षात येतात संबंधित प्रकरणातील आदेश रद्द करण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे.
> – **डॉ. शोभा पुजारी, तहसीलदार नाशिक**

मात्र हे आदेश पारित करताना तहसीलदारांनी कुठलीही शहानिशा केली नसल्याचे स्पष्ट होत आहे. ज्या माधव डामसे यांचे नाव सातबारा सदरी लावण्याचे आदेश देण्यात आले. ते अर्ज दाखल करण्यापूर्वीच मृत झाल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. त्यामुळे तहसीलदारांनी काढलेला आदेश हा नेमका कुणासाठी होता असा सवाल उपस्थित केला जात आहे. ज्या व्यक्तीचे नाव सातबारा सदरी दाखल करण्यात आले ती व्यक्ती म्हणजेच माधव सखाराम डामसे हे दिनांक २७ जून २०२१ रोजी मृत पावले असे असताना त्यांच्या नावाचा अर्ज दिनांक २४ ऑगस्ट २०२१ रोजी म्हणजेच डामसे मृत पावल्यानंतर दोन महिन्यांनी तहसीलदार कार्यालयात दाखल करण्यात आला. या प्रकरणाची कुठलीही शहानिशा नकरतात तत्कालीन तहसीलदार आणि तालुका उपनिबंधकांनी काथ्याकुट करून वेगवेगळे आदेश पारित केले. मृत व्यक्तीच्या नावे असलेल्या अर्जावर पाच वर्षांनंतर निकाल देताना कुठलीही चौकशी केली नसल्याने आश्चर्य व्यक्त केली जात आहे. यामागे काही बिल्डर आणि भूमाफीयांची टोळी सक्रिय असल्याचे बोलले जाते. माधव डामसे हे मृत असल्याचे तहसीलदारांचे निदर्शनास आणून देखील अद्यापही आदेश रद्द करण्यात आलेले नाही. याप्रकरणी सभासदांनी अपील दाखल केले असून त्यावर सुनावणी सुरू आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी साधू-महंत, आखाडे प्रमुखांची मनपात बैठक

**नाशिक ।** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि.२४) नाशिक जिल्ह्यातील विविध आखाड्यांचे साधू-महंत, मंदिर विश्वस्त आणि प्रशासकीय अधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक महापालिका मुख्यालय राजीव गांधी भवन येथे पार पडली.

यावेळी सिंहस्थाच्या नियोजनासाठी सर्वांगीण सोयी सुविधा पुरविण्याबाबत चर्चा करण्यात आली. उपस्थित साधू- महंतांची मते-मागण्या समजून घेण्यात आल्या. यावेळी साधूंनी काही उपाय योजना सुचवितानाच प्रशासनाकडे प्रमुख मागण्याही मांडल्या. मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांनी सर्व आखाड्यांचे प्रमुख, साधू-महंत आणि मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधींचे महापालिकेच्यावतीने शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन स्वागत केले. या बैठकीत महंत भक्तीचरणदास महाराज, महंत सुधीरदास महाराज, फलहारी बाबा महाराज यांसह ७० पेक्षा अधिक साधू-महंत उपस्थित होते. सिंहस्थासाठी विविध सुविधा आणि मागण्या या बैठकीत मांडण्यात आल्या.





यावेळी साधू-महंतांनी मागील कुंभमेळ्यातील प्रशासनाच्या सोयी-सुविधांबाबत समाधान व्यक्त केले. आगामी येऊ घातलेल्या कुंभमेळ्यात अशाच प्रकारे उत्तम व्यवस्थेची मागणी केली. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आखाड्यांना योग्य जागा मिळावी, सर्व आखाडे, खालसे प्रमुख आणि सार्वजनिक संस्थांना या पूर्वीचा गर्दीचा अभ्यास करून नियमानुसार जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली. अमृत स्नानाचे महत्त्व: "शाही स्नान" ऐवजी "अमृत स्नान" या शब्दप्रयोगाचा वापर करावा, अशी सूचनाही केली. ज्यामुळे कुंभमेळ्याचे आध्यात्मिक महत्त्व जगभर पसरेल. शहरातील सर्व मंदिर परिसराजवळ कायमस्वरूपी स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापन करिता डस्टबिन आणि साधूंसाठी निवासी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.गोदावरी नदीची शुद्धता करावी. गोदावरी नदीतील गाळ काढून पात्र स्वच्छ करणे, जेणेकरून भाविकांना शुद्ध तीर्थ मिळू शकेल अशी मागणी करण्यात आली. पार्किंग व्यवस्था चोख ठेवताना शहरातील सर्व मंदिर परिसर व कुंभमेळाच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी पार्किंगची योग्य व्यवस्था करणे. प्रयागराज येथील गर्दी लक्षात घेता नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये योग्य नियोजन करावे, आदींसह मागण्या करण्यात आल्या. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी साधूंच्या मागण्यांना प्राधान्य देऊन शासनाकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही या बैठकीत दिली. आयुक्त मनीषा खत्री यांनीही सर्व मुद्दे शासनापर्यंत नेण्याचे आणि सिंहस्थ यशस्वी करण्यासाठी साधू महंत तसेच उपस्थित सर्वांसमवेत काम करण्या सोबत समन्वय ठेऊन २०२७ मध्ये होणारा कुंभमेळा यशस्वी करण्याबाबत उपाययोजना करू असे सांगितले व सर्व उपस्थितांचे आभार मानले. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे, शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता संदेश शिंदे यांसह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

## भारतरत्न देताना महात्मा फुले यांचे माहात्म्य कुठेही कमी होऊ नये




**नाशिक ।** महाराष्ट्र विधिमंडळाने महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार देण्याचा ठराव मांडला आहे. या निर्णयाचे आपण स्वागत करतो; परंतु भारतरत्न देताना महात्मा फुले यांचे माहात्म्य कुठेही कमी होता कामा नये, अशी भूमिका माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी सभागृहात मांडली.

### छगन भुजबळांनी ठरावावर मांडली सभागृहात भूमिका

राज्याच्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सोमवारी सरकारच्यावतीने सभागृहात महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार देण्याचा ठराव मांडण्यात आला. हा ठराव भारत सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. या ठरावावर भूमिका व्यक्त करताना भुजबळ बोलत होते. भुजबळ म्हणाले की, आज महाराष्ट्र विधानसभेने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना देशाचा सर्वोच्च 'भारतरत्न' पुरस्कार प्रदान करुन गौरवण्याची शिफारस केंद्र सरकारकडे एकमताने ठराव मंजूर केला. केलेल्या ठरावाचे मी स्वागतच करतो; परंतु क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांना देशातील जनतेने दिलेली 'महात्मा' ही पदवी सर्वोच्च पदवी आहे. या देशात फक्त महात्मा फुले, महात्मा गांधी हे दोनच महात्मे असल्यामुळे भारतरत्न देताना महात्मा फुले यांचे माहात्म्य कुठेही कमी होता कामा नये, अशी भूमिका त्यांनी या ठरावावर विधानसभेत बोलताना मांडली.




# गायकांनी गाजवली 'सुहाना सफर' मैफल

**नाशिक ।** अफलातून म्युझिक लव्हर्स ग्रुपतर्फे सुहाना सफर (भाग ५) हा जुन्या हिंदी गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रविवारी (दि. २३) संध्याकाळी परशुराम सायखेडकर नाट्यगृह येथे ही विनामूल्य मैफल रंगली. लोकप्रिय गाण्यांची ही मैफल सहभागी गायकांनी गाजवली. श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत सुरेल सफर अनुभवली. नाशिकमधील ६ सुप्रसिद्ध गायिका माधवी भसे, सुगंधा शेलार, सविता खोडके, प्रज्ञा गोपाले, संगीता दुसाने, पल्लवी पगारे तसेच ७ सुमधुर गायक गोविंदभाई चंदे, मनोज दीक्षित, राजेश अक्कर, मधुकर नाठे, विवेक फुटाणे, संजोग टिपरे, मंगेश खोत हे सहभागी झाले. ए जिंदगी गले लगा ले...या गाण्याने मैफलीचा सुरेल प्रारंभ झाला. प्यार मांगा है..., पल पल दिल के पास..., तेरे चेहरे से...,ये राते ये मौसम...,तुम्हे याद होगा..., ए मेरे दिल कही..., छूकर मेरे मनको... या इतर २५ गाण्यांवर रसिकांनी ताल धरला. सुहाना सफर...या शीर्षक गीताने उत्तरोत्तर रंगलेल्या मैफलीची सांगता झाली. सुप्रसिद्ध निवेदक समीर देसाई यांच्या खुमासदार व अभ्यासपूर्ण निवेदनामध्ये अनेक जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. कार्यक्रमाची संकल्पना अफलातून ग्रुपचे अध्यक्ष हरीष ठक्कर यांची होती. या कार्यक्रमासाठी नाशिककर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिक ते पुणे हरित महामार्ग प्रकल्प अखेर मार्गी लागणार




**वावी ।** गत दोन वर्षांपासून रखडलेला पुणे-नाशिक हरित (औद्योगिक) महामार्ग (ग्रीन कॉरिडॉर) प्रकल्प अखेर मार्गी लागणार आहे. या मार्गाच्या भूसंपादनाची अधिसूचना राज्य सरकारने नुकतीच प्रसिद्ध केली असून, एक हजार ५४५ हेक्टर जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सीमाने या औद्योगिक महामार्ग संदर्भात खासदार श्री राजाभाऊ वाजे व कृषी मंत्री श्री माणिकरावजी कोकाटे यांना निवेदन देऊन पाठपुरावा केला होता. नामदार माणिकरावजी कोकाटे साहेब खासदार राजाभाऊ वाजे यांनीही उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे पाठपुरावा करून औद्योगिक महामार्ग मंजूर करून घेतला. त्याबद्दल सीमा च्या वतीने नामदार माणिकरावजी कोकाटे साहेब व खासदार राजाभाऊ वाजे यांचे अभिनंदन करण्यात आले. या औद्योगिक महामार्गामुळे सिन्नरच्या औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून सिन्नरचा औद्योगिक विकास झपाट्याने होणार आहे असे सीमाचे सचिव बबन वाजे व विश्वस्त रतन पडवळ यांनी सांगितले. पुणे आणि नाशिक या दोन शहरांतील वाहतूक कोंडी सोडवून औद्योगिकीकरणाला चालना देण्यासाठी पुणे-नाशिक दरम्यान १३४ किलोमीटर औद्योगिक द्रुतगती महामार्ग प्रकल्पाचा प्रस्ताव पुढे आला. दरम्यान, याच मार्गाला समांतर पुणे-नाशिक रेल्वेमार्गासाठी महामेट्रोकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला. दोन्हींपैकी कोणता मार्ग निश्चित करायचा याबाबत संभ्रम निर्माण होत पुणे ते नाशिक औद्योगिक द्रुतगती मार्गाचा तांत्रिक आणि वित्तीय सुसाध्यता अहवाल तयार करण्याबाबतचे निर्देश दोन वर्षांपूर्वी देण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) द्रुतगती महामार्गाच्या 'डीपीआर'साठी सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार डीपीआर तयार होत असताना स्थानिकांकडून विरोध दर्शविण्यात आला. स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रकल्प रद्द करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर गत वर्षी पुन्हा या रस्त्याच्या भूसंपादनाबाबत राज्य सरकारने अधिसूचना काढली, तरीदेखील कामास सुरुवात न झाल्यामुळे या अधिसूचनेची मुदत संपुष्टात आली. आता नव्याने या संदर्भातील अधिसूचना राज्य सरकारकडून नुकतीच काढण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठीच्या भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रस्तावित पुणे-नाशिक लांबी सुमारे १३४ किलोमीटर असून, प्रकल्पाकरिता भूसंपादनासह १५ हजार ६९६ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी सुमारे एक हजार ५४५ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे, असेही एमएसआरडीसीतील अधिकाऱ्यांनी सांगितले.




### प्रकल्पाचा फायदा काय?

- या द्रुतगती महामार्गामुळे पुणे-नाशिक या दोन शहरांतील अंतर कमी होणार
- दोन ते अडीच तासांच्या प्रवासामुळे शहरे जवळ येणार
- नाशिकमधील कृषी बाजारपेठा आणि पुण्यातील औद्योगिक कंपन्यांमुळे विकासाला चालना मिळणार व कनेक्टीव्हीटी वाढणार.

# न्यायव्यवस्थेलाही कीड लागली का?

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरातून १५ कोटी रुपयांची रोकड जप्त केल्याप्रकरणी कारवाई सुरू करण्यात आली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डीके उपाध्याय यांनी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना अंतर्गत चौकशी अहवाल सादर केला. आता कॉलेजियम यावर पुढील कारवाई करेल. काही दिवसांपूर्वी पश्चिम महाराष्ट्रातील एका जिल्ह्यात न्यायाधिशाला पाच लाखाची लाच घेताना पकडण्यात आले होते. सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचे काम करणारे न्यायाधिशच जर लाच घेवून निकाल देत असतील, न्यायव्यवस्थेलाच कीड लागली असेल, तर अपेक्षा करायची कुणाकडून?

## कोण आहेत न्यायमूर्ती यशवंत वर्मा?



- जन्म: ६ जानेवारी १९६९
- ठिकाण: अलाहाबाद, यूपी
- शिक्षण : पदवीधर (हंसराज कॉलेज), बी. कॉम ऑनर्स (दिल्ली विद्यापीठ), एलएलबी (रीवा विद्यापीठ)

## न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचे महत्त्वाचे निर्णय...

- सत्येंद्र जैन प्रकरण (ऑक्टोबर 2022) – आप नेते आणि दिल्लीचे मंत्री सत्येंद्र जैन यांच्याविरुद्धची कारवाई थांबली.
- दिल्ली मद्य धोरण प्रकरण (नोव्हेंबर 2022) - सीबीआय आणि अंमलबजावणी संचालनालयाला मद्य धोरण घोटाळ्याच्या चौकशीच्या संदर्भात सार्वजनिक अधिकृत प्रेस रीलिझ आणि मीडिया स्टेटमेंट जारी करण्याचे आदेश दिले.
- AAP नेते दुर्गेश पाठक यांचा निवडणूक वाद (जुलै 2023) - 2022 च्या दिल्ली विधानसभा पोटनिवडणुकीत AAP नेते दुर्गेश पाठक यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका स्वीकारली.
- आयकर पुनर्मूल्यांकन विवाद (मार्च 2024) – काँग्रेस पक्षाने आयकर पुनर्मूल्यांकनाविरुद्ध दाखल केलेली याचिका फेटाळण्यात आली.

---

एनडीटीव्हीनुसार, न्यायमूर्ती वर्मा यांचे नाव सीबीआयच्या एफआयआरमध्ये होते. हे प्रकरण २०१८ चे आहे. सीबीआयने सिंभोली साखर कारखाना आणि त्याच्या संचालकांविरुद्ध आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यावेळी न्यायमूर्ती वर्मा हे कंपनीचे गैर-कार्यकारी संचालक होते.

ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्सने मिलमधील अनियमिततेबद्दल तक्रार केली होती. साखर कारखान्याने बनावट कर्ज योजनेद्वारे बँकेची फसवणूक केल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, दिल्ली अग्निशमन सेवेचे प्रमुख अतुल गर्ग यांनी म्हटले आहे की, न्यायाधीशांच्या घरात रोख रक्कम सापडली नाही असे मी कोणतेही विधान केलेले नाही.

१४ मार्च रोजी होळीच्या रात्री ११.३५ वाजता लुटियन्स दिल्ली येथील न्यायमूर्ती वर्मा यांच्या बंगल्यात आग लागल्यानंतर ही रोकड जप्त करण्यात आली. दिल्ली अग्निशमन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले आणि आग विझवली. घटनेच्या वेळी न्यायमूर्ती वर्मा शहराबाहेर होते. त्याचे कुटुंब घरात उपस्थित होते.

दिल्ली उच्च न्यायालयातील बार सदस्यांनी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र उपाध्याय यांच्यासमोर हा मुद्दा उपस्थित केला आणि त्यांना कारवाई करण्याची विनंती केली. सरन्यायाधीशांनी उत्तर दिले की न्यायाधीशांना या प्रकरणाची जाणीव आहे.

सर्वोच्च न्यायालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध अंतर्गत चौकशी सुरू केली आहे. त्यांना अलाहाबाद उच्च न्यायालयात स्थानांतरित करण्याचा प्रस्ताव वेगळा आहे. निवेदनात म्हटले आहे की, न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी घडलेल्या घटनेबाबत चुकीची माहिती आणि अफवा पसरवल्या जात आहेत.

दिल्ली अग्निशमन सेवेचे प्रमुख अतुल गर्ग म्हणाले की, १४ मार्च रोजी रात्री ११:३५ वाजता आगीची माहिती मिळाली. आग स्टोअर रूममध्ये लागली, जिथे स्टेशनरी आणि घरगुती वस्तू होत्या. अग्निशमन बचाव कार्यादरम्यान कोणतीही रोकड सापडली नाही.

दिल्ली अग्निशमन सेवेचे प्रमुख अतुल गर्ग म्हणाले की, रोख रक्कम सापडली नाही असे मी कोणतेही विधान केलेले नाही. ही दोन परस्परविरोधी विधाने केल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकरणावर एक निवेदन जारी केले. ज्यामध्ये असे म्हटले होते की रोख रक्कम सापडल्याबद्दल खोटी माहिती आणि अफवा पसरवल्या जात आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आज सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना प्राथमिक अहवाल सादर करतील. यानंतर पुढील कारवाई केली जाईल.

या संपूर्ण घटनेदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने न्यायमूर्ती वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात परत बदली केली. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निवेदनात स्पष्ट केले की न्यायाधीशांच्या बंगल्यातून रोख रक्कम सापडल्याच्या बातमीचा आणि त्यांच्या बदलीचा कोणताही संबंध नाही.

### प्रकरण कसे उघडकीस आले?

१४ मार्च रोजी, म्हणजे होळीच्या रात्री, रात्री ११:३० वाजता, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या दिल्लीतील सरकारी बंगल्यात आग लागली. जेव्हा न्यायमूर्ती वर्मा घरी नव्हते तेव्हा त्यांच्या कुटुंबीयांनी अग्निशमन दल आणि पोलिसांना कळवले.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, बंगल्याच्या स्टोअर रूममध्ये आग लागली होती. ती एक छोटीशी आग होती. अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आणि त्यांनी आग विझवण्यास सुरुवात केली आणि पोलिसही पोहोचले. यावेळी एका खोलीत रोख रकमेचा ढीग आढळला.

### या प्रकरणात पुढे काय?

उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या घरातून रोख रक्कम जप्त झाल्याची बातमी समोर आल्यानंतर, दिल्ली उच्च न्यायालयाने प्राथमिक चौकशी सुरू केली होती. यानंतर, २० मार्च रोजी संध्याकाळी सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमनेही एक बैठक घेतली. दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डीके उपाध्याय यांनी पुरावे आणि माहिती गोळा करण्यासाठी अंतर्गत चौकशी प्रक्रिया सुरू केली होती. त्याचा अहवाल सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना सादर केला जाईल.

कॉलेजियम या अहवालाची चौकशी करेल, त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. तथापि, न्यायमूर्ती वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यासाठी वेगळा प्रस्ताव ठेवण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, हस्तांतरण प्रस्तावाची २० मार्च रोजी कॉलेजियमने तपासणी केली.

यानंतर, सर्वोच्च न्यायालयाचे सल्लागार न्यायाधीश न्यायमूर्ती वर्मा यांच्यासह संबंधित उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांना पत्रे पाठविण्यात आली. न्यायालयाने म्हटले आहे की या लोकांकडून मिळालेल्या उत्तरांची तपासणी केली जाईल आणि त्यानंतर कॉलेजियम एक ठराव मंजूर करेल.

### माहिती सार्वजनिक करावी

ज्येष्ठ वकील इंदिरा जय सिंह यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमच्या निर्णयात पारदर्शकतेचा अभाव असल्याची टीका केली आहे. त्या म्हणाल्या, अपऱ्या माहितीच्या आधारे भाष्य करणे मला अयोग्य वाटते. कॉलेजियमला घटनेशी संबंधित माहिती सार्वजनिक करण्याची विनंती आहे. कोणत्या परिस्थितीत रोख रक्कम वसूल करण्यात आली? याबद्दल सर्वांना माहिती असायला हवी. आतापर्यंत लोकांसमोर फक्त अनुमान आहेत. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत न्यायाधीश कारवाईपासून मुक्त नाही.

काँग्रेस खासदार जयराम रमेश यांनी शुक्रवारी राज्यसभेत हा मुद्दा उपस्थित केला. न्यायलयीन जबाबदारीचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाविरुद्ध महाभियोगाबाबत प्रलंबित सूचनेचा संदर्भ अध्यक्षांना दिला.

भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी सोशल मीडियावर लिहिले की, न्यायमूर्ती वर्मा २०१२ ते ऑगस्ट २०१३ पर्यंत यूपीचे मुख्य स्थायी वकील होते. तेव्हा अखिलेश यादव मुख्यमंत्री होते. याबद्दल कोणी माजी उत्तर प्रदेश मुख्यमंत्र्यांना विचारले का?

न्यायमूर्ती वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली झाल्याच्या वृत्तावर उच्च न्यायालय बार असोसिएशनने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. असोसिएशनने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, 'भ्रष्टाचारात सहभागी असल्याच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती वर्मा यांची अलाहाबाद येथे बदली केली आहे. ही शिक्षा आहे की बक्षीस? अलाहाबाद उच्च न्यायालय कचऱ्याचा डबा आहे का? बार असोसिएशनचे अध्यक्ष अनिल तिवारी म्हणाले, 'एका सामान्य कर्मचाऱ्याच्या घरात १५ लाख रुपये असतात. जर तो सापडला तर त्याला तुरुंगात पाठवले जाते. न्यायमूर्ती वर्मा यांनी राजीनामा द्यावा. जर ते इथे सामील झाले तर आम्ही त्यांचे स्वागत करू देणार नाही. ते न्यायालयात चालणार नाही.

### न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराचा बळी सामान्य माणूसः न्यायमूर्ती धिंग्रा

निवृत्त न्यायाधीश एसएन धिंग्रा म्हणाले, 'न्यायपालिकेत बऱ्याच काळापासून भ्रष्टाचार आहे. हे थांबवण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले गेले नाही. सामान्य माणसाला त्रास होतो. न्यायाधीशांच्या घरात चलन सापडले तेव्हा सर्वोच्च न्यायालयाला एफआयआरसाठी परवानगी द्यावी लागली.

सामान्य माणसावर ज्या पद्धतीने कारवाई केली जाते त्याच पद्धतीने पुढील कारवाई केली पाहिजे. सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष विकास सिंह म्हणाले की, न्यायमूर्ती वर्मा यांना राजीनामा देण्यास सांगितले पाहिजे. हस्तांतरण हा उपाय नाही.

■ ■ ■

---

## अपंगत्व हरले



राजस्थानातील बांसवाडा येथील कृष्णा हा जन्मतःच विनाहातपायाचा जन्माला आला. जगण्याची आशा नव्हती, पण आता तो सहावीत शिकतो. तो कोपरांआधारे लिहितो आणि गुडघ्यांवर चप्पल घालून चालतो. शाळा कधीही चुकवत नाही.

या हुशार विद्यार्थ्याला मोठे झाल्यावर शिक्षक व्हायचे आहे. तो फक्त कोपरांनी क्रिकेट खेळतो. वडील प्रभुलाल मजूर आहेत. कृष्ण स्वतः अंघोळ करतो आणि तयार होतो.असे वाटत होते भविष्यात काहीच करणार नाही कृष्ण जसजसा मोठा होत गेला तसतसा त्याचा संघर्ष वाढला. लहान कृष्णाचा प्रचंड आत्मविश्वास आणि आवड त्याच्या अपंगत्वामुळे थांबू शकली नाही. कृष्ण गुडघ्यांवर चालतो. ४ वर्षांचा असताना शाळेत जाऊ लागला. तो ५ वर्षांचा असताना आईचे निधन झाले. आजोबा त्याला घरापासून दोन किलोमीटरवरील पीएम श्री स्कूल छोटी सरवनला सोडतात. सुटीनंतर तो स्वतः पायी घरी जातो. वडील प्रभुलाल मैदा म्हणतात - मुलाचे हास्य इतके सुंदर होते की त्यामुळे ते अपंगत्वानंतरही सर्व दुःख विसरले. म्हणून कृष्णा नाव ठेवले. ■ ■

---

**बालपण कुठे मिळाले तर पाठवा...**

**पुष्कळसे मित्र-मैत्रिणी**
**हरवले आहेत**

**झोप कुठे मिळाली**
**तर पाठवा**
**पुष्कळशी स्वप्ने**
**अपुरी राहिली आहेत**

**आराम कुठे मिळाला**
**तर पाठवा**
**खुपशी सुखे**
**उपभोगायची आहेत**

**नाती कुठे मिळाली**
**तर पाठवा**
**माणसुकीला शोधायचे**
**राहिले आहे**

**मी कुठे मिळालो**
**तर मला पाठवा**
**माझ्या मी पणांत**
**मीच हरवलो आहे.**

**राजु रणवीर**
**तहसीलदार, काटोल.**

---

## आला उन्हाळा आरोग्य सांभाळा..!

राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे.

राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे.

उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी.

उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत.

उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते. डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे.

शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही.

मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीच्या उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.

■ ■ ■



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

---

## फुटपाथवर भाजी विकताना त्याने लिहिली १८ पुस्तके

मणिकांचन संयोग, श्रीमद्भागवत शब्दार्थ, श्रीकृष्ण गीता शब्दार्थ... आसामी भाषेत लिहिलेल्या या पुस्तकांचे लेखक भाजीविक्रेते आहेत. नाव लक्षीराम दुवरा दास.

देशातील सर्वात मोठे नदी बेट असलेल्या माजुली येथील कैवर्ते गावचे ते रहिवासी, परंतु गेल्या २० वर्षांपासून जोरहाटमधील फुटपाथवर भाजीपाला विकत आहेत. त्यांनी १८ पुस्तके लिहिली आहेत. वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आली. शिक्षण सोडावे लागले तेव्हा ते बीएच्या शेवटच्या वर्षाला होते.

ते म्हणतात- माझे पहिले पुस्तक हरिभक्ती अमृतवाणी लिहिले तेव्हा कोणीही ते छापण्यास तयार नव्हते. घर विकले. ५० हजार मिळाले. त्यातून हे पुस्तक प्रकाशित झाले. सुंदर बुढागोहाई आसाम पोलिसात आहेत. त्यांनी लक्ष्मीरामची सर्व पुस्तके वाचली आहेत. ते म्हणतात, त्यांची पुस्तके आपल्याला स्वतःचे मूल्यांकन करण्यास भाग पाडतात.

लक्षीराम म्हणतात की काही तरुणांनी घरावर हल्ला केला. सर्व सामान तोडले. कारण माहीत नव्हते, पण मी आत्मपरीक्षणास सुरुवात केली.

मला वाटले की कुठेतरी मी काहीतरी चूक केली असेल तेव्हाच ही घटना घडली. यानंतर माझी आध्यात्मिक पुस्तकांमध्ये आवड वाढू लागली.

### आसाम साहित्य सभेचा पुरस्कार

लक्षीराम यांना आसाम साहित्य सभेने पुरस्कार दिला. आसाम भाषा गौरव योजनेअंतर्गत आसाम सरकारने सन्मानित केले. कोच राजवंशी विद्यार्थी संघटनेनेही सन्मान केला. ■ ■ ■

---

## कडू कारल्याचे सेवन मधुमेही रूग्णांसाठी वरदान



आजकाल बहुतेक लोकं मधुमेहाने त्रस्त आहेत. त्यामुळे मधुमेहांच्या रूग्णांसाठी त्यांच्या आहराचा रक्तातील साखरेवर चांगला परिणाम होतो. कारण आपण जो आहार घेतो त्यामुळे साखरेची पातळी वर-खाली होत राहते, जी निर्यंत्रित करणे मधुमेहींसाठी मोठे आव्हानात्मक बनते.

अशा परिस्थितीत मधुमेहांच्या लोकांनी कोणत्या अन्नपदार्थांचे सेवन करावे व करू नये याची शंका लोकांना येत असते. यापैकी एक म्हणजे कडू काकडी जी मधुमेही लोकं सेवन करू शकतात. अनेकांच्या मनात हा प्रश्न असतो की मधुमेहाच्या रुग्णांसाठी कडू कारले चांगले आहे का?

मधुमेहाच्या रुग्णांसाठी कडु कारले फायदेशीर आहे. त्यात काही नैसर्गिक संयुगे असतात जे रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करतात.

**रक्तातील साखर कमी करण्यास उपयुक्त :** कडू कारल्यामध्ये चारॅन्टीन आणि पॉलीपेप्टाइड-पी नावाचे संयुगे असतात. हे संयुगे रक्तातील साखरेची पातळी नैसर्गिकरित्या कमी करण्यास मदत करतात. याशिवाय, ते इन्सुलिनसारखे काम करतात आणि रक्तातील साखरेचे प्रमाण निर्यंत्रित करतात.

**ग्लुकोज चयापचय सुधारते :** कडू कारल्यामध्ये असलेले संयुगे मधुमेही रूग्णांच्या शरीरातील ग्लुकोजच्या चयापचय सुधारते. याचा अर्थ असा की आपण जे काही काबोर्हायड्रेट खातो ते योग्यरित्या विघटित होते आणि उर्जेमध्ये रूपांतरित होते आणि रक्तात जास्त साखर जमा होत नाही.

**अँटिऑक्सिडंट गुणधर्म आरोग्य सुधारतात :** मधुमेहाच्या रुग्णांना हृदय, किडनी आणि डोळ्यांशी संबंधित अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. कडू कारल्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्स कमी करण्याचे काम करतात, ज्यामुळे मधुमेहांच्या रूग्णांना होणारे नुकसान टाळता येते. हे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढवते आणि जळजळ कमी करण्यास मदत करते. ■ ■ ■

---

**अशोकायन**
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## जल है तो...

**उष्णतेची आलीय लाट**
**जलसाठे होती भुईसपाट**
**पाणी म्हणजे जीवन**
**समजुन घ्या अर्थ**
**अन्यथा संभवतो अनर्थ ..**

**पाण्याचा काटकसरीने**
**करावा वापर**
**पुनर्वापरावर द्यावा भर**
**तर काही अंशी -**
**दिलासा मिळेल क्षणभर . !**





FANtertainment



FANtertainment





## महत्त्वाचे

### ‘केटीएचएम’ मध्ये आर्थिक विषयावर व्याख्यान

**नाशिक ।** वयाच्या पंधराव्या वर्षापासून आर्थिक प्रवास सुरू होतो. आर्थिक स्वातंत्र्यात संपत्ती नियोजन, कर्जे नियोजन, आर्थिक आपत्कालीन नियोजन, कर नियोजन, वैयक्तिक आर्थिक नियोजन, जोखीम नियोजन हवे. तसेच, आर्थिक नियोजनात ध्येय महत्त्वाचे असते, असे



प्रतिपादन आर्थिक सल्लागार समीर कदम यांनी केले. केटीएचएम महाविद्यालयात आयोजित ‘आर्थिक जोखीम व नियोजन’ या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे, उपप्राचार्य डॉ. एस. के. शिंदे, विभागप्रमुख किरण रेडगावकर, प्रा. रामनाथ पवार, प्रा. दिलीप गावले, प्रा. एन. बी. कुयटे, सहकारी परेश जोशी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. तोरणे यांनी केले. यावेळी समीर कदम म्हणाले की, आयुष्यात आर्थिक स्वातंत्र्य मिळवले पाहिजे. पैसा कमविण्याचे बंधन नको. प्रत्येकाने आपले आर्थिक नियोजन करावे. पैसा आल्यावर आपण दैनंदिन खर्चात गुंतवणूक करतो. आर्थिक नियोजन आयुष्यभर गरजेचे असते. आर्थिक नियोजनामुळे बचतीची सवय लागते. जीवनात, नोकरी जीवनात अथवा नोकरीत अनेक प्रकारची आव्हाने असतात. त्या आव्हानावर मात करून बचतीची सवय लावली पाहिजे. आपल्या भविष्यातील उत्पन्न व खर्चाचे पुढील पाच ते दहा वर्षांचे विवरण तयार करा व आपला पैसा गुंतवणूक करा, असा महत्त्वपूर्ण सल्ला समीर कदम यांनी दिला.

### ॲड. सुनील बोराडे यांचा सत्कार

**नाशिक ।** अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या नियामक मंडळावर नाशिक विभागातून सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल मविप्रचे ज्येष्ठ सभासद व माजी नगरसेवक ॲड. सुनील कारभारी बोराडे यांचा मविप्रच्या मध्यवर्ती कार्यालयात मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची ११७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २३) पुणे येथे पर्वती पायथा या संस्थेच्या प्रांगणात संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. याप्रसंगी २०२५ ते २०३० या पंचवार्षिक विश्वस्त मंडळाची निवडणूक पार पडली. त्यामध्ये अध्यक्षपदी खासदार शरदचंद्र पवार, उपाध्यक्षपदी अजित पवार, सरचिटणीसपदी प्रमिला गायकवाड यांची एकमताने निवड झाली. या सभेत संस्थेच्या नियामक मंडळाच्या सदस्यांचीही नियुक्ती करण्यात आली. त्यामध्ये ॲड. सुनील बोराडे (नाशिक) व इंजि. शिवाजीराव देवकर (कोपरगाव) यांची नियुक्ती करण्यात आली. ॲड. सुनील बोराडे यांच्या निवडीबद्दल विविध स्तरातून त्यांच्या निवडीचे स्वागत होत आहे. नाशिकरोड येथील माजी नगरसेवक असलेले ॲड. सुनील बोराडे हे समर्थ सेवा मंडळ, पंचक, शालेय समितीचे अध्यक्ष, जनता विद्यालय पंचक व मविप्रचे ज्येष्ठ सभासद, महाराष्ट्र साहित्य परिषद नाशिकरोड या व इतर अनेक संस्थांवर यशस्वी कामकाज केल्यामुळेच त्यांना महाराष्ट्रातील या नामवंत संस्थेत एक आगळीवेगळी सेवा करण्याची संधी मिळाली, अशी प्रतिक्रिया ॲड. नितीन ठाकरे यांनी व्यक्त केली.

### सिमेंटचा ट्रक दरीत कोसळला; दोन ठार

**इगतपुरी ।** मुंबई आग्रा महामार्गावरील नवीन कसारा घाटात नाशिकहून मुंबईकडे सिमेंट वाहतूक करणारा ट्रक खोल दरीत पडल्यामुळे झालेल्या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. नवीन कसारा घाटातील ब्रेक फेल पॉईंटजवळ सिमेंटने भरलेला ट्रक मुंबईकडे जात असतांना दरीत कोसळला. ही अपघाताची घटना शुक्रवारी (दि. २१) पहाटेच्या सुमारास घडली. ट्रकचालकाचे नियंत्रण सुटल्याने हा ट्रक दरीत कोसळून अपघात झाला. अपघातात ट्रकचा पूर्ण चक्काचूर झाला असून दरीत पूर्णपणे सिमेंट पसरले आहे. माहिती मिळताच महामार्ग पोलीस केंद्र घोटी व रूट पेट्रोलिंग टीम व कसारा शहापूर येथील आपत्ती टीमचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या अथक प्रयत्नांनी मृतदेह बाहेर काढण्यात आले./ या अपघातात एम.एच.१८-बीजी-९००४ या ट्रकचा चालक सौद अहमद अन्सारी (वय २८ रा. मालेगाव) व त्याचा सहकारी अब्दुल मजीद अब्दुल वहाब हे ठार झाले.

### शीतपेयांचे दर वधारले

**नाशिक ।** यंदा मार्च महिन्याच्या प्रारंभापासूनच तापमान वाढल्याने जीवाची काहिली होत आहे. त्यामुळे नागरिक जीवाला थंडावा लाभावा यासाठी शीतपेये, ताक, लस्सी, मठ्ठा, पन्हे, सरबत, नारळपाणी, फळांचे रस याचा आधार घेत आहेत. त्यामुळे या साऱ्या गोष्टी महागला असून, सामान्यांना परवडत नसल्याचे चित्र आहे, १० ते १५ रुपयांना मिळणारा ताकाचा एक पेला आता २० ते २५ रुपयांना मिळत आहे. इतरही गोष्टींचे दर प्रति पेला ५ ते १५ रुपयांपर्यंत वाढले असून, लिंबू चांगला वधारला आहे. ५ ते १० रुपयांना लिंबू मिळत आहे. तरीही नागरिक थंडावा लाभावा यासाठी गर्दी करू लावगले आहे.

# पालकमंत्रिपदाचा हा तिढा सुटायचा नाय...

## विनापालक नाशिकला दत्तक पित्याकडून... 'तोपर्यंत मीच पालक'चा दिलासा!

राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होऊन चार महिन्याचा कालावधी उलटूनही अद्याप नाशिक जिल्ह्याला पालकमंत्री मिळालेला नाही. पालकमंतत्रिपदाचा तिढा लवकरच सुटेल! फक्त एवढेच सांगून वेळ मारून नेली जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विकासकामांना खीळ बसली असून, केवळ प्रतीक्षा आणि प्रतीक्षा करावी लागत आहे. रविवारी (दि. २३) नाशिक-त्र्यंबकेश्वर दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा "लवकरच पालकमंत्रिपदाचा तिढा सुटेल" हीच कॅसेट वाजवली अन विषय बदलला. मुलाखतकर्त्याने पुन्हा या मुद्द्याची री ओढली असता... तोपर्यंत मीच नाशिकचा पालक असे सांगत मुद्द्याला बगल दिली.



पालकमंत्रिपदाचा तिढा लवकरच सुटेल अशी मल्लिनाथी महायुतीच्या तीनही घटक पक्षांकडून केली जात आहे; पण नेमका तिढा आहे तरी काय याबाबत मात्र कोणीच भाष्य करायला तयार नाही. त्यामुळे हा मुद्दा अधिकाधिक अधोरेखित होत आहे, झाला आहे. आगामी येऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याला अवघी दीड-पावणेदोन वर्षे उरली आहे. सर्व तयारी करायची बाकी आहे. अशी दोलायमान स्थिती असतानाही अन पालकमंत्र्यांची नियुक्ती अति गरजेची असतानाही तिढा कशापायी आहे, हेच कळत नाही. मग साहजिकच या मुद्द्यावरून सामान्य नागरिक, नाशिककर प्रश्न उपस्थित करणारच! सिंहस्थासाठी येऊ घातलेला हजारो कोटींचा निधी त्याला कारण आहे का? त्याच्यामुळे लढा निर्माण झालेला आहे का? असे एक ना नाना प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे, झाले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाशिक दौऱ्यात आढावा बैठक घेतली. नाशिक-त्र्यंबकेश्वरची पाहणी केली. काही निर्णय घेतले, घोषणा केल्या. प्राधिकरण स्थापन करण्यात येत असून, प्रयागराजच्या धर्तीवर लवकरच कायदा करण्यात येणार असल्याचे सांगितले. कुंभमेळ्याच्या तयारीच्या दृष्टीने राज्य सरकार पावले टाकत आहे यात शंका नाही; परंतु हे करत असताना जिल्ह्याला विनापालक कसे ठेवले जात आहे? ... तोपर्यंत मीच नाशिकचा पालक असे सांगून मुख्यमंत्री नाशिककरांची बोळवण करीत असल्यासारखे वाटते. तुम्हीच पालक आहात तर तशी रितसर घोषणा करा ना! नाशिककरांना विनानावाचा पालक लाभणार का?

मुख्यमंत्री या नात्याने तोपर्यंत नाशिकच्या पालकत्वाची जबाबदारी माझीच असल्याची त्यांनी ठासून सांगितले; पण तिढा मात्र 'जैसे थे' ठेवला. नाशिक दौऱ्यात पालकमंत्रिपदाचे प्रबळ दावेदार गिरीश महाजन आणि दादा भुसे दोघेही उपस्थित होते. मंत्रिमंडळ स्थापनेपासून व त्यानंतर झालेल्या विस्तारापासून हा तिढा तसाच आहे. सिंहस्थ कुंभमेळा समीप आला



आहे. नाशिकच्या पालक संस्थेवर प्रशासक आहे, निवडणुका या ना त्या कारणाने लांबत आहेत, त्यात पालकमंत्रीही नाही. असे असतानाही महायुतीला पालकमंत्र्याच्या नियुक्तीचा तिढा सोडविता येत नाही म्हणजे कमालच झाली म्हणायची! एककल्ली कारभार आणि वर्चस्व ठेवण्याच्या नादात महायुतीतील घटक पक्षांना लोकसभा निवडणुकीप्रमाणे किंमत मोजावी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. खास करून भाजपला! सामान्य लोकांना जर हे कळतं तर महायुतीला कळत नसेल असे अजिबात नाही. फक्त प्रतिष्ठा, वर्चस्व राखण्यासाठी ही मिथ्या धडपड आहे, हे एव्हना सारे नाशिककर जाणून चुकले असावेत! नाशिकमधील भाजपकडून पडद्याआडून गिरीश महाजन यांना पालकमंत्रिपदासाठी बुस्ट दिले जात आहे. त्यांच्या नावाची एक दोन वेळा फलकबाजीही होऊन गेली. महाजन यांना फलकबाजीतून शहर-जिल्ह्यातील गुन्हेगारीशी संबंधित मंडळींनी उचलून धरल्याने महाजन यांना पालकमंत्रिपदावर नियुक्ती होऊनही पायउतार व्हावे लागले होते. महाजन यांनी नियुक्ती केली तेव्हा तिढा सुटला होता का? नाईलाजाने त्यांना पदावरून बाजूला व्हावे लागल्यानंतर पुन्हा तिढा वाढला का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्याने कृषिमंत्री माणिकराव कोकाटे बाजूला पडले. शर्यतीतील दावेदार उरले ते केवळ दादा भुसे! असे असले तरी तिढा कायमच!




दीपक भावसार
८३२९४६०२३०

### दत्तकपित्याने आता रितसर पालक व्हावे

गेल्या पंचवार्षिकमध्ये विद्यमान आणि तत्कालीनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक शहर दत्तक घेतल्याची घोषणा^ केली होती. नाशिकला त्यामुळे काही काळ दत्तक पिता लाभला होता. आता दत्तक पित्याने नाशिकसाठी काय केले, काय दिले तो भाग वेगळा; परंतु चालू पंचवार्षिकमध्ये मात्र या दत्तक पित्याने नाशिकला दूर केले. सद्यस्थितीत नाशिकला दत्तक पिताही नाही अन रितसर पालकही नाही. तिढा सुटेपर्यंत मीच नाशिकचा पालक असे मुख्यमंत्री सांगत आहेत. तो तिढा एवढ्या सहजासहजी सुटेल अशी चिन्हे नाहीत त्यामुळे महायुतीने नाशिकला एकतर रितसर पालकमंत्री द्यावा नाहीतर मुख्यमंत्र्यांनी रितसर जबाबदारी सांभाळावी, अशी जनतेची मागणी आहे. नाहीतर देवाभाऊंनी पुन्हा दत्तक नाशिकची घोषणा करून टाकावी!

# अंबड लिंकरोडवर आग; फर्निचरची चार दुकाने खाक

## अग्निशामक दलाचे शर्थीचे प्रयत्न; तीन तासांनी आग आटोक्यात





**सिडको ।** शनिवारी रात्री अडीचच्या सुमारास अंबड लिंक रोड येथे भीषण आग लागली. या आगीत फर्निचरची तीन ते चार मोठी दुकाने जळून खाक झाली. आग लागल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

सिडको व अग्निशामक दलाचा बंब, सातपूर अग्निशामक दलाचे दोन बंब आणि मुख्यालयाचा एक बंब अशा सहा बंबांच्या मदतीने तीन तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली. या बचावकार्यामुळे मोठे नुकसान टळले. या दुर्घटनास्थळी सिडको अग्निशामक दलाचे केंद्रप्रमुख प्रमोद लहानगे, सातपूर अग्निशामक दलाचे केंद्रप्रमुख सोमेश पगार, लीडिंग फायरमन अविनाश सोनवणे, सुनील शिलावट, एस. आर. जाधव, विजय ठाकूर तसेच मुख्यालयातील दिनेश लासुरे आणि दहा ते बारा प्रशिक्षणार्थी अग्निशामक कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे आग पूर्णपणे विझवण्यात यश आले. सध्या आग लागण्याचे कारण आणि झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतला जात आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

## ‘माझी प्रारतना’ या नव्या मराठी चित्रपटाचं टिझर रिलीज

**नाशिक ।** प्रेम म्हणजे जीवनात प्रत्येक गोष्टीत सौंदर्य शोधण्याची कला, पण सर्वांना प्रेम सहज मिळत नाही. अशीच एक अभूतपूर्व प्रेम कथा येत्या ९ मे २०२५ ला अनुभवायला मिळणार आहे. पद्मराज राजगोपाल नायर लिखित आणि दिग्दर्शित ‘माझी प्रारतना’ हा नवा सिनेमा भेटीला येत आहे. याच चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झालाय. प्रेम, प्रेमातील विश्वासघात आणि त्या विकट परिस्थितीत प्रेम मिळवण्यासाठीची जिद्द या टिझर मध्ये पहायला मिळते. "माझी प्रारतना" हा सिनेमा ब्रिटिश काळात, महाराष्ट्राच्या अगदी ग्रामीण भागात घडलेली संगीत प्रधान प्रेम कथा आहे. आयुष्यात किती ही अडचणी असतील तरी प्रेमात मात्र जीवनात सर्वकाही जिंकण्याची ताकद आहे अशी स्तब्द करणारी ही कहाणी आहे. या चित्रपटात पद्मराज राजगोपाल नायर आणि अनुषा अडेप हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. मराठी सिनेश्रृष्टीतील आणखी काही उत्कृष्ट कलाकार यात दिसणार आहेत. एस आर एम फिल्म स्कूल प्रस्तुत "माझी प्रारतना" या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन पद्मराज राजगोपाल नायर ह्यांनी केलं आहे, पद्मराज नायर फिल्म्स ह्यांची निर्मिती आहे, तर विश्वजित सी टी ह्यांनी संगीत दिलंय. सिनेमाचं पोस्टर आणि टिझर पाहून प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. अपरिमित ताकद, अथांग समर्पण असे प्रेम, जे इतिहासावर स्वतःची छाप सोडेल असा हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.




# एसटीचा प्रवास होणार अधिक आरामदायी, सुखकर...

## ‘स्वमालकीच्या’ ३००० बीएस, ६ लालपरी खरेदी करण्यासाठी काढले टेंडर

एसटी महामंडळाने स्वमालकीच्या बीएस ६ च्या ३ हजार लालपरी खरेदी करण्यासाठी निविदा काढली आहे. या लालपरी अधिक आरामदायी असून, ५४ सीटर असणार आहेत. यामुळे राज्यातील एसटी प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर आणि आरामदायी होणार आहे. या ३ हजार बस खरेदीकरिता राज्य सरकार महामंडळाला एक हजार २०० कोटी रुपये देणार आहे. महामंडळाच्या ताफ्यात सध्या १४ हजार बस आहेत; परंतु त्यापैकी सुमारे ४० टक्के बसचे आयुर्मान पूर्ण झाले असल्याने त्या येत्या काही महिन्यांत प्रवासी सेवेतून बाद होतील. सध्याच्या घडीला एसटीतून दिवसाला सुमारे ५३ लाख प्रवासी प्रवास करतात. या प्रवाशांच्या सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाकरिता स्वमालकीच्या बस घेण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.



एसटी महामंडळाने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी स्व-मालकीच्या बीएस ६ मानकाच्या डिझेल इंजिन असलेल्या चेसिसवर पूर्णपणे बांधून तयार असलेल्या एकूण ३ हजार लालपरी बस खरेदी करण्यासाठी टेंडर काढले आहे. या बस चेसिस खरेदी आणि त्यावर बॉडी ही बस चेसिस पुरवठादारांशी संलग्नित कारखान्यातून बस बॉडी बांधून घेतली जाणार आहे. ही बस डिझेल इंधनवर चालणारी ११ मीटर लांबीची २ बाय ३ पुश बँक ५४ सीट्स असलेली साधी बस अशा प्रकारातील असणार आहे.

महमंडळाने प्रवासी सेवेत शिवशाही, शिवनेरी, इ बस आणल्या; परंतु आजही प्रवशा ची पहिली पसंती साध्या लालपरीला आहे. यामुळे एस टी महामंडळाने आता पुन्हा साध्या लालपरी बस घेण्याचा निर्णय घेतला आहे. कर्नाटकाच्या धर्तीवर लालपरीतून जास्तीत जास्त प्रवाशाची वाहतूक व्हावी आणि प्रवाशांना उभे रहावे लागू नये, यासाठी कर्नाटकाच्या धर्तीवर लालपरीमध्ये बदल करण्यात येत आहेत. नवीन बस या ‘टू बाय श्री’ असणार आहेत. एसटी महामंडळाने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी स्व-मालकीच्या बीएस६ मानकाच्या डिजल इंजिन असलेल्या चेसिस वर पूर्णपणे बांधून तयार असलेल्या एकूण ३००० (तीन हजार) लालपरी बसेस खरेदी करण्यासाठी टेंडर काढले असून ह्यामध्ये बस चेसिस खरेदी आणि त्यावर बॉडी ही बस चेसिस पुरवठादारांशी संलग्नित कारखान्यातून बस बॉडी बांधून घेतली जाणार आहे. बस ही डिजल इंधनवर चालणारी ११ मीटर लांबीची २ बाय २ pushback सीट्स असलेली साधी बस अशा प्रकारातील राहणार आहे. टेंडर संबंधी माहितीही mahatenders ह्या पोर्टल वर देखील उपलब्ध आहे आणि सर्व प्रक्रिया ही त्याच वेबसाईटवर ऑनलाइन पद्धतीने होणार आहे.




किरण घायदार
९३७००८१६१२

### दरवर्षी पाच हजार बस

एसटी महामंडळ दरवर्षी स्वमालकीच्या पाच हजार साध्या लालपरी बस खरेदी करणार आहे. यासाठी महामंडळातर्फे पंचवार्षिक योजना तयार केली आहे. महामंडळात यापुढे कुठल्याही पद्धतीने भाडेतत्त्वावर बस न घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही नुकताच घेण्यात आला आहे. त्यामुळे स्वमालकीच्या बस घेण्यात येणार आहेत. या आर्थिक वर्षात पहिल्या टप्यात 3 हजार बस येणार आहेत. सध्या २६४० लालपरी बस सप्टेंबर अखेरपर्यंत येणार आहेत. दरमहा ३०० बस याप्रमाणे सप्टेंबर अखेरपर्यंत २६४० लालपरी एसटीच्या ताफ्यात दाखल होतील.

# नाशिककरांना बसली पाणीबाणीची झळ...

## कोरडया शनिवार-रविवारने पाणीटंचाईची अनुभूती

नाशिक । जलावाहिनीच्या दुरुस्तीच्या कामासाठी महापालिकेने गेला शनिवार (दि. २२) संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवला होता. शनिवारी दुरुस्तीचे काम पूर्ण न झाल्याने शहरातील काही भागात मपाणीपुरवठा झाला, काही ठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा झाला तर काही ठिकाणी अजिबातच पाणीपुरवठा झाला नाही. तशीच काहीशी स्थिती सोमवारीही राहिली. त्यामुळे नाशिककरांना दोन तीन दिवसांच्या कृत्रिम पाणीटंचाईची अनुभूती आली.

शनिवारी पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने आणि रविवारी कमी प्रमाणात, कमी दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याने अनेक महिलांनी पाणीसाठा करून ठेवला होता. पण दोन दिवस पाणी न आल्याने हा साठाही संपुष्टात आला. तुपामुळे घराघरातून पाणी पाणी असा आक्रोश सुरू होता.

अनेक नागरिकांनी हातपंप, कूपनलिका यांचा आधार घेतला तर अनेकांनी बाहेरून पाण्याचे टँकर मागविले. शहरात अनेक ठिकाणी महिला वर्ग, पुरुष मंडळीही हातात बादल्या, हंडे-कळशा घेऊन पाण्याचा शोध घेतांना दिसले. पाणीबाणीमुळे पंचवटी, जुने नाशिक, सिडको, सातपूर, इंदिरानगर आदींसह विविध भागात पाण्यासाठी नागरिक वणवण करीत होते. दोन तीन दिवसात टँकरचालकांनी पाणी विक्रीचा चांगला व्यवसाय केला. यंदा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण समूहामध्ये समाधानकारक पाणीसाठा असला तरी वेळेवर मान्सून आला नाही तर आणि तापमान वाढून पाणीसाठा कमी झाला तर पाणीटंचाईचा फटका बसू शकतो. सर्वच नागरिकांनी आतापासूनच पाणी बचतीची सवय अंगिकारणे गरजेचे आहे.



दोन तीन दिवस केवळ कृत्रिम पाणीटंचाई झाली तरी नागरिक त्रस्त झाले. पाण्यासाठी लोकांना संघर्ष करावा लागला. अनेकांचे पाण्यावरून वादही झाले. घराघरात पाणी याच विषयावर चर्चा, बोलणे सुरू होते. अनेकांनी दोन दिवस आंघोळीला सुट्टी दिली. कपडे धुतलेच नाही. कमीत कमी पाण्याचा वापर करीत दोन तीन दिवस पाणी पुरविले. अनेकांना खूप पाणी लागते. आवश्यक तेवढे पाणी वापरले तर काहीच हरकत नाही; पण पाण्याची नासाडी होऊच नये यासाठी साऱ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. महापालिकेला जलवाहिनीच्या दुरुस्तीच्या कामासाठी दोन दिवस पाणीपुरवठा नाईलाजाने बंद करावा लागला तरी नागरिकांनी महापालिकेच्या नावाने शंख केला. भविष्यात मोठा तांत्रिक दोष निर्माण झाला तर महापालिकेला सहकार्य करावेच लागेल अन्यथा सुविधेपासून वंचित रहावे लागेल.

# [illegible]



**स्थान:** दक्षिण केरळमधील, थिरुवनंतपुरम शहरापासून साधारणतः ६१ किलोमीटर.


**उंची:** समुद्रसपाटीपासून ९१५ मीटर ऊंच.

थिरुवनंतपुरमपासून काही किमी ड्राईव्हच्या अंतरावरच पोन्मुडि हे मनोरम असे हिल रिसॉर्ट आहे जेथे तुम्ही निमुळते चक्राकार रस्ते,शीतल आणि हिरव्यागार अशा वातावरणाचा आनंद लुटू शकता. विविध प्रकारांनी सजलेली पहाडी फुले, रंगीबेरंगी फुलपाखरे, छोट्या छोट्या नद्या यांनी सजलेले पोन्मुडि आपल्याला ट्रेकिंगसाठी देखील एक उत्तम स्थान बहाल करते. चहाचे मळे आणि धुक्यांनी भरलेल्या घाटींमुळे पोन्मुडि हे कॉटेज आणि डॉर्मिटरी अकोमडेशन (धर्मशाळा निवास) या सुविधांनी युक्त असे आणि जोमाने विकसित होणारे हिल रिसॉर्ट आहे.

**येथे पोहोचण्यासाठी: जवळचे रेल्वे स्थानक:** थिरुवनंतपुरम सेंन्ट्रल, साधारण ६१ किमी **जवळचा विमानतळ:** थिरुवनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळ, साधारण ६७ किमी.




# [illegible]



विदर्भातील रामटेक हे धार्मिक स्थळ म्हणून प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील भाविकांबरोबर इतर राज्यांमधूनही अनेक भाविकांचा ओघ रामटेकला असतो. रामटेक पासून सहा-सात किलोमिटर अंतरावर एक बलदंड भुईकोट किल्ला आहे. हा किल्ला म्हणजे नगरधनचा किल्ला होय.

रामटेकच्या प्रसिद्ध अशा धार्मिक व पर्यटन स्थळाच्या जवळ असूनही नगरधनचा किल्ला मात्र अनेकांना अपरिचित आहे. रामटेकच्या डोंगरावरुन नगरधनचा किल्ला ओळखू येतो.

नगरधनचा किल्ला रामटेक तालुक्यात असून नागपूर जिल्ह्यामध्ये आहे. नागपूर ते जबलपूर असा राष्ट्रीय महामार्ग आहे. हा महामार्ग क्र. ७ आहे. या महामार्गावर मनसर हे गाव आहे. या मनसर गावातून पश्चिमेकडे रामटेककडे जाण्यासाठी किंवा तुमसर (जि. भंडारा) कडे जाण्यासाठी रस्ता फुटतो. या रस्त्याने रामटेक गाठल्यावर तेथून सहा-सात किलोमिटर दक्षिणेकडे नगरधन गाव गाहे.

नगरधन गावाच्या बाहेर (गाव ओलांडल्यावर) नगरधनचा किल्ला आहे. नागपूरपासून वाहनाने दिडतासात आपण नगरधन पर्यंत पोहोचू शकतो. नगरधन हे पूर्वी 'नंदीवर्धन' या नावाने परिचित होते असे काही संशोधकांचे मत आहे.

नगरधनचा भुईकोट हा प्रथमदर्शनी आपल्याला मोहवून टाकतो. नगरधन किल्ल्याने कात टाकून नवे रुप धारण केलेले आहे. याची तटबंदी व आतील भाग नव्याने दुरुस्त केलेला आहे. लालसर पण काळ्यारंगाची झाक असलेल्या चिर्‍यांनी किल्ल्याची तटबंदी व दरवाजा बांधून काढल्यामुळे त्याचे सौंदर्य कैकपटींनी वाढलेले आहे.

नगरधनच्या भव्य दरवाजावर काही शिल्पे अंलकृत केलेली आहेत. शिरोभागी गणेशाची प्रतिमा आहे. दोन्ही बाजूंना चषक कोरलेले आहेत. दाराच्या बाजूला द्वारपाल कोरलेले असून त्यांच्या खांद्यावर कबुतर दाखवले आहे. पुर्वी निरोपानिरोपी करण्यासाठी कबुतरांचा वापर करीत असत. दाराच्या आत पहारेकर्‍यांच्या देवड्या आहेत. पुर्वी आत येणार्‍यांची चौकशी व झाडाझडती येथेच घेतली जायची.

दारातून आत शिरल्यावर तटबंदीवर जाण्यासाठी पायर्‍यांचा मार्ग केलेला आहे. तटबंदीवर चढल्यावर आपण तटबंदीवरुन फेरी मारु शकतो. या रुंद तटबंदीवर निरीक्षणासाठी मनोरे केलेले आहेत. येथून रामटेक किल्ल्याचे दर्शन उत्तम होते. किल्ल्याच्या आत वाड्याचे तसेच इतर निवासस्थानांचे अवशेष आहेत. किल्ल्यामध्ये तीन मजली खोल विहीर आहे. या मजल्यावर कमानीयुक्त खोल्या असून पायर्‍या उतरुन तिथपर्यंत पोहोचता येते. किल्ल्यामध्ये मंदिर, तसेच काही ठिकाणी प्राचीन अवशेषही पहायला मिळतात. नगरधनचा किल्ला हा वाकाटक कालीन असल्याचे मानले जाते. म्हणजे साधारण चवथ्या शतकातील किल्ला असावा. जुन्या आणि नव्याचा संगम असलेला नगरधनचा भुईकोट आटोपशीर आकाराचा असल्यामुळे तो पहाण्यासाठी एखादा तास आपल्याला पुरतो. नगरधनच्या भेटीत आपण रामटेकचा किल्ला व तेथेच नव्याने उभारलेले देखणे असे कालीदासाचे स्मारक ही पाहू शकतो. आपण पूर्व नियोजन व्यवस्थित केल्यास या भेटीतच तोतलाडोहचे अभयारण्यही पाहता येवू शकते.

# [illegible]



अरबी व्यापारी आपले गलबत घेऊन कोकण किनार्‍यावरुन जात होता. सारे काही सुरळीत आहे असे वाटत असतानाच अकस्मात मोठे वादळ सुरु झाले. पाहता पाहता काही दिसेनासे झाले. या वादळात त्याचे गलबत कोठे भरकटले ते समजण्यास काहीच मार्ग नव्हता. या भरकटलेल्या जहाजाला थांबविण्यासाठी कोठे किनारा दिसतो का याचा तो व्यापारी शोध घेवू लागला. याच वेळी त्या प्रचंड

कोकणात श्रद्धास्थानाची कमी नाही. गणपतीपुळे, पावस, पाली यासारख्या देवळांबरोबरच देवगड जवळील दक्षिणकाशी समजले जाणारे श्रीक्षेत्र कुणकेश्वर हे देखील प्रसिद्ध मंदीर आहे .

देवगडच्या दक्षिणेस २० कि.मी. वर असलेले श्री क्षेत्र कुणकेश्वर निसर्गरम्य सौंदर्यस्थळ आणि दक्षिण काशी म्हणून समजले जाते. श्री कुणकेश्वर मंदिराचे वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम आणि किनार्‍यावरील या मंदिराचे स्थान यामुळे या मंदिराच्या देखणेपणात भर पडली आहे. हे मंदिर अकराव्या शतकात बांधले गेले असावे, असे स्थानिक लोक सांगतात. या मंदिराचे संपूर्ण काम अत्यंत कलात्मक असे आहे. अनेक वर्षे भाविक श्रद्धेने या मंदिराला भेट देत असतात.

या मंदिराविषयी एक दंतकथा सांगितली जाते. कोणे एके काळी एक वादळात त्याला लांबवर एक लुकलुकणारा दिवा दिसला. त्या दिव्याच्या दिशेने त्याने आपले गलबत महत्प्रयासाने हाकारले. घोंघावणार्‍या वादळातही न विझता त्या व्यापार्‍याला सुखरुप किनार्‍यावर आणणारा तो दिवा म्हणजे शंकराच्या छोट्याशा मंदिरातील पणती होती. यामुळे कृतज्ञतेपोटी त्या व्यापार्‍याने यानंतर या ठिकाणी मंदिराची उभारणी केली. मंदिराच्या बाजुलाच एक कबरही आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्याचा हा एक आदर्श नमुना आहे.

कुणकेश्वराचे मंदीर कोकणात दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. येथील शंकराची पिंड भव्यदिव्य असून ती निसर्गनिर्मित आहे, असे सांगितले जाते. श्रावणात दूरवरुन भाविक येथे दर्शनासाठी येतात. कोकण दौर्‍यात फिरताना सहजपणे कुणकेश्वराचे दर्शन अवश्य घ्या.

# [illegible]

कासा उर्फ पद्मदुर्ग हा जलदुर्ग आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला कासा किल्ला मुरुड गावा जवळील समुद्रात आहे. मुरुड हे गाव तालुक्याचे असून ते रायगड जिल्ह्यामध्ये आहे. मुरुड हे जंजिरा या जलदुर्गामुळे प्रसिध्दच आहे. या मुरुड गावाजवळ जंजिरा, सामराजगड आणि कासा उर्फ पद्मदुर्ग असे किल्ले आहेत.

मुरुडला जाण्यासाठी अलिबाग रेवदंडा मुरुड असा एक गाडी मार्ग आहे. मुंबई-पणजी महामार्गावरील नागोठणे अथवा कोलाड येथून रोहे गाठावे रोह-चणेरे बिरवाडी मार्गे मुरुडला जाता येते. तसेच मुंबई-पणजी महामार्गावरील इंदापूर येथून तळा-भालगाव मार्गेही मुरुड गाठता येते.

मुरुड गावातून राजपुरीकडे जाणारा गाडी रस्ता आहे. या रस्त्यावरच्या खाडीलगत एकदरा गाव आहे. याच्या किनार्‍यावर अनेक मच्छीमारी नावा उभ्या असतात. या मच्छीमारी नौकावाल्याकडे चौकशी केल्यास यातील एखादी नौका आपल्याला कासा किल्ल्याकडे घेवून जावू शकते आपण संख्येने जास्त असल्यास फारसा आर्थिक भार पडत नाही. सागराची आणि हवामानाची परिस्थिती पाहूनच हे मच्छीमार कासाकडे येण्यासाठी तयार होतात. आपण आगावू चौकशी करुन किंवा आदल्या दिवशी जर नौका ठरवली तर वेळेची बचत होऊन गैरसोय टळू शकते.

जवळ असलेल्या जंजिरा किल्ल्याच्या सहाय्याने सिद्दी अतिशय प्रबळ झाला होता. त्याच्या आरमारी सामर्थ्याने त्याने किनारपट्टीवर धाक जमवला होता. सामान्य रयतेची पिळवणूक होत होती. त्यामुळे सिद्दीच्या अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी शिवाजी राजांनी मुरुडच्या सागरात असलेल्या कासवाच्या आकाराच्या बेटावर किल्ला बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कासा उर्फ पद्मदुर्ग हा जलदुर्ग बांधला. त्याबद्दल महाराजांनी उद्गार काढले, पद्मदुर्ग वसवून राजापुरीच्या (जंजिरा) उरावरी दुसरी राजापुरी उभी केली आहे. कासा किल्ल्यामुळे जंजिर्‍याच्या सिद्दीला चांगलाच पायबंद बसला.

एकदण्यापासून किंवा राजापूरीपासून नावेने तासाभरात आपण कासा किल्ल्याला पोहोचतो. कासा किल्ल्याचे दोन भाग आहेत. एक मुख्य किल्ला आणि त्यासमोरील पडकोट. पडकोट मोठ्या प्रमाणावर नामशेष होत आला आहे परंतु मुख्य किल्ल्याची तटबंदी मात्र अजूनही उत्तमपैकी शाबूत आहे. मुख्य दारासमोरील मोठा बुरुज तग धरुन उभा आहे. या बुरुजाच्या चर्या कमळाच्या पाकळ्याप्रमाणे फुललेल्या आकाराच्या आहेत. म्हणूनच याला पद्मदुर्ग असे नाव दिले गेले असावे. कासा उर्फ पद्मदुर्ग किल्ल्याच्या बांधकामाचे एक वैशिष्ठ येथे पहावयाला मिळते. तटबंदीच्या दोन दगडांमधे सिमेंटिंग म्हणून चुना वापरलेला आह. गेल्या साडेतीनशे वर्षामधे सागराच्या लाटांच्या तडाख्याने आणि खार्‍या पाण्यामुळे तटबंदीचा दगड झिजून गेला आहे. या दगडाची झीज पाच ते दहा से.मी.एवढी झाली आहे. तरीही दोन दगडांमधला चुना अजूनही शाबूत आहे. शिवकालीन बांधकामाचे हे वैशिष्ट्य आपल्याला चकित करते. पडकोटामधील चौकोनी विहीर, तोफा, इमारतींचे अवशेष असे पाहून आपण मुख्य किल्ल्याकडे निघायचे पडकोट आणि मुख्य किल्ला या मधील खडकावर समुद्रामधून वाहून आलेल्या शंख शिंपल्यांचा ढीग साचलेला आहे.

कासा किल्ल्याच्या महाव्दारामधे प्रवेश करण्यासाठी चार पाच पायर्‍या चढाव्या लागतात. दाराच्या आतल्या बाजूला पहारेकर्‍याच्यासाठी केलेल्या देवड्या आहेत. किल्ल्याच्या तटावर जाण्यासाठी पायर्‍यांचा मार्गही आहे. मधल्या भागामधे नव्या जुन्या वास्तूंचे अवशेष पहायला मिळतात. काही काळ भारतातील कस्टम ऑफिसचे एक कार्यालय येथे थाटलेले होते. हे चौकीवजा कार्यालय येथून हलल्यावर या सगळ्या वास्तूचा ताबा निसर्गाकडे आला त्यामुळे सगळ्या वास्तूंची रयाच गेलेली दिसते. चारही बाजुंनी खारे पाणी असताना आतमधे गोड्या पाण्याची चार टाकी केलेली दिसतात. किल्ल्याचा दर्या दरवाजा आणि त्याचे स्थापत्य पाहून परत फिरायचे. तटबंदीवरुन जंजिरा आणि सामराजगड किल्ले दिसतात. मुरुडचा किनाराही उत्तम दिसतो.



# घोसाळगड उर्फ वीरगड

घोसाळगड उर्फ वीरगड हा किल्ला रायगड जिल्ह्यामधे आहे. दुर्गसंपन्न असलेल्या कोकणातील रायगड जिल्ह्यामधे रोहे तालुका आहे. रोहे तालुक्यात घोसाळगडाचा किल्ला आहे.

मुंबई-पुणे या महानगरांशी रोहे हे गाडीमार्गाने जोडले गेले आहे. शिवकालापासून प्रसिध्द असलेले रोहे गाव कुंडलिका नदीच्या दक्षिण तीरावर वसलेले आहे. मुंबई - पणजी महामार्गाच्या पश्चिमेकडे असलेल्या रोहे येथे जाण्यासाठी महामार्गावरील नागोठेणे तसेच कोलाड येथून फाटे आहेत. तसेच रोहे हे कोकण रेल्वेवरील महत्त्वाचे रेल्वे स्थानकही आहे.



रोहे येथून मुरुड या सागरकिनार्‍यावरील गावाला जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. त्यापैकी एक चणेरे - बिरवाडी कडून कुंडलिका नदीच्या किनार्‍याने जातो. तसेच दुसरा मार्ग घोसाळगडाकडून भालगाव मार्गे जातो. याच मार्गावर घोसाळगडाचा किल्ला आहे. चारही बाजुंना लहान मोठ्या डोंगरांच्या मधे घोसाळगड विराजमान झालेला आहे. समुद्र सपाटीपासून २६० मीटर उंच असलेल्या घोसाळगडाचा आकार दूरुन शिवलिंगासारखा भासतो.

रोहे एस.टी. स्थानकावरून घोसाळगडाला जाण्यासाठी एस.टी.बसेसची सोय आहे. साधारण तासाभरात आपण घोसाळगड गावात पोहोचतो. गडाच्या पायथ्याला घोसाळगड गाव आहे.

गावातूनच गडावर जाणारा रस्ता आहे. रस्ता संपल्यावर पायर्‍यांचा मार्ग केलेला आहे. या पायर्‍यांच्या मार्गावर भवानी मातेचे मंदिर असून त्यापुढे गणपतीचे प्रशस्त मंदिर आहे. मंदिरामधील गणेशमुर्ती स्वयंभु आहे. गणेशाला वंदन करुन चढाई सुरु करायची पंधरावीस मिनिटांमधे आपण गडाच्या तटबंदीजवळ येवून पोहोचतो. कातळात कोरलेल्या पायर्‍या समोर दिसतात. यातील काही पायर्‍या तोफांच्या मार्‍यामुळे ध्वस्त झालेल्या आहेत. या पायर्‍यांवरुन वर पोहोचल्यावर मधेच काही चांगल्या पायर्‍या लागतात. या पायर्‍या आपल्याला दरवाजा पर्यंत घेऊन जातात. मात्र येथिल प्रवेशव्दार पुर्णत: नष्ट झालेले आहे. त्याचे अवशेष येथे विखूरलेले आहेत. या अवशेषांमधे वाघांची चित्रे कोरलेले दगडही पहायला मिळतात. येथून थोडे वर दारूगोळ्याचे कोठार म्हणून जागा आहे. येथून पुढे गेल्यावर गडाचे दोन भाग पडतात. एक माचीकडील तर दुसरा बालेकिल्ल्याकडील अरुंद असलेल्या डोंगर सोंडेवर तटबंदी बांधून ही माची तयार केलेली आहे. तटबंदीवर चढण्यासाठी पायर्‍या आहेत. या तटबंदीमधे त्याकाळातील शौचकूप पहायला मिळतात. माचीच्या टोकावर पुर्वी एक तोफ पडलेली होती.

माचीपाहून आपण बालेकिल्ल्याकडे प्रस्थान करायचे बालेकिल्ल्याच्या उंचवटय़ावर पाण्याच्या कोरीव टाक्या, घरांचे अवशेष, माथ्यावर किल्लेदाराचा वाडा असल्याच्या खुणा आढळतात.

गडाच्या माथ्यावरुन तळागडाचे दर्शन मनाला सुखवून जाते. कुडे मांदाडच्या खाडीचे दृष्य आपल्याला खिळवून ठेवते. शिवकालामधे स्वराज्यात असलेला घोसाळगड पुर्वी निजामशाही मधे होता. छत्रपती शिवाजी महाराज प्रतापगडाच्या समर प्रसंगात अडकलेले पाहून जंजिर्‍याच्या सिध्दीने घोसाळगडाला वेढा दिला होता पण अफझलखान मारला गेल्याचे कळाल्यावर सिध्दी वेढा उठवून पळून गेला. पुढे पुरंदरच्या तहात शिवाजी महाराजांनी घोसाळगड मोगलांना दिला नाही. तो आपल्याकडेच राखला. असा हा महत्त्वाचा किल्ला दुर्लक्षीत आहे. गडदर्शन करुन आल्यावाटेने उतरुन परतीचा मार्ग पकडता येईल. अथवा येथून चालत तीन तासांच्या पायपिटीनंतर बिरवाडीच्या किल्ल्याला जाता येते. बसने तळा किल्ला अथवा जंजिरा किल्ला ही गाठता येईल.

# [illegible]

स्थान: अलप्पुझा समुद्र किनारा, अलप्पुझा शहराजवळ, दक्षिण केरळ

पूर्वेचे व्हेनिस म्हणून ओळखल्या जाणार्या अलप्पुझाने केरळच्या सागरी इतिहासात नेहमीच महत्वाचे स्थान भूषविले आहे, आज, ते नौका शर्यत, बॅकवॉटर सुट्ट्या, समुद्र किनारे, सागरी उत्पादने आणि कॉयर उद्योग यांसाठी प्रसिद्ध आहे. अलप्पुझा समुद्र किनारा हे एक लोकप्रिय सहलीचे ठिकाण आहे. इथल्या समुद्रात गेलेला खांब १३७ पेक्षा अधिक वर्ष जुना आहे. विजया बीच पार्कमधील मनोरंजनाच्या सुविधा समुद्रकिनार्यानच्या आकर्षणात भर घालतात. इथे जवळच एक जुने लाईटहाऊसही आहे जे पर्यटकांना आकर्षित करते.

अल्लप्पुझामध्ये असताना घ्यावयाचा अन्य आनंददायक अनुभव आहे हाऊस बोट क्रूझ. अल्लप्पुझाच्या बॅकवॉटरमध्ये तुम्हाला हाऊस बोट पहायला मिळतात त्या खरंतर जुन्या काळातल्या केट्टुवल्लमचे सुधारित रुप आहे. मूळ केट्टुवल्लम किंवा राईस बार्जेज कित्येक टन तांदूळ आणि मसाले वाहून नेत. केट्टुवलम किंवा 'गाठींची होडी' ला असे म्हणत कारण संपूर्ण होडी नारळाच्या दोरखंडांच्या साहाय्याने एकत्र बांधली जात असे. हल्लीच्या हाऊस बोट एका चांगल्या हॉटेलच्या सर्व सुविधांनी युक्त असतात, ज्यात सुसज्ज शयनकक्ष, आधुनिक शौचालय, आरामदायक बैठकीची खोली, स्वयंपाकघर आणि गळाने मासे पकडण्यासाठी गॅलरीही उपलब्ध असते आणि हाऊस बोट मध्ये रहात असताना तुम्ही बॅकवॉटर जीवनाच्या दृश्यांचा कोणत्याही अडथळ्याविना आनंद लुटू शकता.

**येथे पोहोचण्यासाठी: जवळचे रेल्वे स्थानक:** अलप्पुझा, समुद्रकिनार्या पासून अंदाजे ५ किमी **जवळचा विमानतळ:** कोचिन आंतरराष्ट्रीय विमानतळ, अलप्पुझा शहरापासून अंदाजे ८५ किमी.



# सेन्सेक्सने घेतली १०७८ अंकांची उसळी
## गुंतवणूकदारांनी कमावले पाच लाख कोटी

**मुंबई, दि.२४ प्रतिनिधी**

मागील ५ महिन्यांपासून सातत्याने भारतीय शेअर बाजारात घसरण चालू होती. टाटा, रिलायन्स व इन्फोसिस सारख्या तगड्या कंपन्यांना देखील या स्थितीचा फटका बसला आणि त्यांच्या शेअर्सची घसरण झाली. बाजाराची गंभीर स्थिती पाहून अनेक गुंतवणूकदारांनी माघार घेतली. मात्र जे गुंतवणूकदार आपले पाय रोवून उभे राहिले त्यांना आता त्यांच्या संयमाची फळं मिळू लागली आहेत. कारण गेल्या आठवड्यात बाजार पूर्वपदावर येण्यास सुरुवात झाली. तर आता बाजार सुस्थितीत दिसू लागला आहे.

शेअर बाजारासाठी आज 24 मार्च हा आणखी एक चांगला दिवस होता. सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही सलग सहाव्या दिवशी वधारून बंद झाले. सेन्सेक्सने 1078 अंकांची उसळी घेतली. तर निफ्टी 23,650 च्या जवळ वाढला. गेल्या एका महिन्यातील या दोन्ही निर्देशांकांची ही सर्वोच्च पातळी आहे. त्यामुळे आज शेअर बाजारात गुंतवणूकदारांना 5.19 लाख कोटी रुपयांचा फायदा झाला आहे.

बँकिंग आणि आयटी शेअर्समध्ये जोरदार खरेदी, परदेशी गुंतवणूकदारांनी माघार घेतल्याने आणि चांगल्या आर्थिक आकडेवारीमुळे गुंतवणूकदारांची भावना मजबूत झाली आहे. लघु आणि मध्यम शेअर्समध्येही नेत्रदीपक वाढ दिसून आली. बीएसईचा मिडकॅप निर्देशांक 1.32 टक्क्यांच्या वाढीसह आणि स्मॉलकॅप निर्देशांक 1.17 टक्क्यांच्या वाढीसह बंद झाला. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स 1,078.88 अंकांनी वाढून 77,984.38 वर बंद झाला. तर निफ्टी 323.55 अंकांच्या वाढीसह



**सेन्सेक्स 77,984**

**निफ्टी 23,673**

23,673.95 वर बंद झाला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज 24 मार्च रोजी वाढून 418.49 लाख कोटी रुपये झाले, जे त्याच्या आधीच्या ट्रेडिंग दिवशी म्हणजे शुक्रवार 21 मार्च रोजी 413.30 लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप आज 5.19 लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत 5.19 लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

सेन्सेक्समधील 30 पैकी 23 शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये एनटीपीसीच्या शेअर्समध्ये सर्वाधिक 4.51 टक्के वाढ झाली आहे. यानंतर कोटक महिंद्रा बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय), टेक महिंद्रा आणि पॉवर ग्रिडचे शेअर्स 3.27 टक्क्यांनी ते 4.51 टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले.

तर सेन्सेक्सचे केवळ 7 शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. यामध्येही टायटनचे शेअर्स 2.68 टक्क्यांनी घसरले. तर इंडसइंड बँक, झोमॅटो, महिंद्रा अँड महिंद्रा (M&M) आणि भारती एअरटेलचे शेअर्स 0.46 टक्क्यांपासून 2.42 टक्क्यांपर्यंत घसरले.

# प्रदीप म्हापसेकर यांचे अमूर्त शैलीतले एकल प्रदर्शन आजपासून
## कृष्ण-धवल कॅनव्हासवर सुवर्ण रेषांचा धुंद प्रवास 'मेरीगोल्ड'

**मुंबई दि. २४ प्रतिनिधी**


रशिया- युक्रेन संघर्ष, अमेरिकेचे व्यापार युद्ध, जागतिक अनिश्चितता या सगळ्या वातावरणात सध्याच्या घडीला सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने साठवणूक वाढली आहे. त्याचवेळी मुंबईच्या फोर्ट मधील आर्ट एंट्रन्स गॅलरीमध्ये कॅनव्हास वरील सुवर्ण रेषा डोळ्यांनी टिपत एक अनोखी सुवर्ण झळाळी कलाप्रेमींना देखील मनात साठवून ठेवता येणार आहे. निमित्त आहे ते प्रसिद्ध चित्रकार प्रदीप म्हापसेकर यांच्या 'मेरीगोल्ड' चित्रप्रदर्शनाचे.

अनेक वर्ष माध्यमात काम केलेले आणि नंतर पेंटिंगच्या विश्वात रममाण झालेले प्रदीप म्हापसेकर यांचे अमूर्त शैलीतील एकल प्रदर्शन आज २५ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान आर्ट एंट्रन्स गॅलरी आर्मी नेव्ही बिल्डिंग, तळमजला, जहांगीर आर्ट गॅलरी समोर, फोर्ट येथे भरणार आहे.

ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंग हा म्हापसेकरांच्या आवडीचा विषय. ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंग घाईगडबडीत करण्याचे काम नाही हे लक्षात आल्यावर ते स्थिर पेंटिंग कडे वळले. इलेस्ट्रेशनवर अनेक वर्षे हात फिरवल्यानंतर हळूहळू त्यांच्या रेषांची



शैली बदलत गेली किंबहुना ती अधिक सोपी होत गेली. ॲबस्ट्रॅक्ट आणि रेषांच्या खेळांची छाप त्यांच्या चित्रात नेहमीच ओघवतेपणी आलेली बघायला मिळते. हा साधेपणाच नंतर मला ॲबस्ट्रॅक्ट शैलीकडे घेऊन गेला. ॲबस्ट्रॅक्ट म्हणजे मनाचा आणि मेंदूचा एक सुंदर संवाद असतो. अदृश्य आकारांचा अनोखा खेळ असतो, असे ते म्हणतात. म्हापसेकर यांच्या चित्रात रंग खूप कमी असतात.




म्हणजे बऱ्याच चित्रात कृष्णधवल रंग पाहायला मिळतात. याविषयी बोलताना ते म्हणाले, होय, रंग तर सगळ्यांनाच आवडतात. मलाही आवडतात आणि प्रत्यक्ष आपल्या आजूबाजूला आपण खूपच रंग बघत असतो. काळा पांढरा रंग मला माझ्या चित्रात जास्त दिसतो. कारण ती रंगसंगती मला खूप आवडते. हे रंग जगाची एक अलिप्त अदृश्य भाषा बोलतात.

### मेरीगोल्ड - तीन रंगांचा अमूर्त शैलीतील मुक्त वावर

मेरीगोल्ड चित्रकल्पनेविषयी बोलताना ते म्हणाले, मेरीगोल्ड ही गोल्डन म्हणजे सोनेरी रंगातली थीम आहे. काळ्या पांढऱ्या कॅनव्हासवर सुवर्ण रेषांचा हा एक धुंद प्रवास आहे. इथे सुवर्ण किरणांचा साक्षात्कार होतो. सोनेरी रंग आणि रेषा यांच्यावर आधारित अमूर्त शैलीत सादर केलेली आहे. सोनेरी, काळा आणि पांढरा या तीन रंगांचा सुंदर संगम इथे पाहायला मिळतो. हे तिन्ही रंग अमूर्त प्रदेशात मुक्तपणे वावरताना दिसतात. जवळपास ६० ते ६५ चित्र या प्रदर्शनात मांडलेली आहेत असे ते म्हणाले.

प्रदर्शन वेळ सकाळी 11 ते संध्याकाळी 7 पर्यंत असेल. मंगळवार 25 मार्च 2025 रोजी सायंकाळी सहा वाजता 'आई कुठे काय करते' मालिकेतील घराघरात पोहोचलेले अनिरुद्ध देशमुख म्हणजेच प्रख्यात अभिनेते मिलिंद गवळी यांच्या हस्ते होईल.

# सासऱ्याला पैसे परत द्यायला लागू नये म्हणून रचले दरोड्याचे नाटक

**कोझिकोड, दि. २४ वृत्तसंस्था**

केरळच्या कोझिकोड एका व्यावसायिकाने सासऱ्याची फसवणूक करण्यासाठी रचलेल्या दरोड्याच्या कटाचा पोलिसांनी पर्दाफाश केला. व्यावसायिकाने त्याच्या कारमधून ४० लाख रुपये चोरीला गेल्याची तक्रार केली होती. मात्र पोलिसांच्या तपासानंतर सासऱ्याला फसवण्यासाठी दरोड्याचं खोटं नाटक रचण्यात आल्याचे समोर आलं. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी हा सगळा बनाव समोर आणला. या प्रकरणात पोलिसांनी तिघांना अटक करुन पुढील चौकशी सुरु केली आहे. पीएम राहीस, साजिद उर्फ शाजी आणि जमशेद अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

कोझिकोड जिल्ह्यातील कुट्टीकत्तूरमध्ये ४० लाख रुपयांच्या चोरीच्या प्रकरणात मुख्य संशयिताने सासऱ्याची फसवणूक करण्यासाठी बनावट चोरीचा कट रचल्याचे समोर आलं. पीएम राहीस मयंकोत्तुचलील (३५) असं जावयाचे नाव आहे. त्याने कारमधून ४० लाख रुपये चोरीला गेल्याचे सांगितले होते. मात्र पोलिसांच्या तपासात सासरच्या मंडळींना पैसे द्यायला लागू नये म्हणून जावयानेच दरोड्याचे नाटक केले होते.

२० मार्च रोजी राहिसने त्याच्या कारमध्ये ठेवलेले ४०,२५,००० रुपये खाजगी रुग्णालयाच्या पार्किंगमधून चोरीला गेल्याची तक्रार पोलिसांकडे केली होती. चोरट्यांनी कारची काच फोडली आणि गोणीत एका बॉक्समध्ये ठेवलेले ४० लाख आणि डॅशबोर्डमधून २५ हजार चोरल्याचे राहिसने सांगितले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता हेल्मेट घातलेले दोघे कारच्या काचा फोडत असल्याचे दिसून आले. त्यानंतर कारमधील आतील एक बॉक्स काढून ते पळून गेले.

पोलिसांनी दुचाकीचा शोध घेतला असता नंबर प्लेट बनावट असल्याचे आढळून आले. बऱ्याच प्रयत्नानंतर पोलिसांनी दुचाकी शोधून काढली आणि साजिद उर्फ शाजी आणि जमशेद या दोन संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान राहिसने त्यांना दरोड्याची योजना आखण्यास सांगितल्याचे दोघांनी सांगितले. साजिदने पोलिसांना सांगितले की कारमधून चोरलेल्या वस्तू राहिसने सांगितल्याप्रमाणे नव्हत्या. कारच्या मागच्या सीटमध्ये एक बॉक्स आणि बॅग होती पण त्यात पैसे नव्हते. यानंतर राहिसला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्यानंतर राहिसने हा बनावट दरोडा असल्याचे कबुल केलं.


# अमेरिकेने वर्षभरात 2.79 लाख विद्यार्थ्यांचे व्हिसा अर्ज नाकारले

**वॉशिंग्टन, दि. २४ वृत्तसंस्था**

भारतासह जगभरातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी किंवा उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाऊ इच्छितात त्यांच्यासाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. कारण विद्यार्थ्यांसाठी अमेरिकेला जाणं आता सोपं राहिलेलं नाही. अमेरिका सातत्याने परदेशी विद्यार्थ्यांचा व्हिसा नाकारत आहे. गेल्या दशकभरात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात अमेरिकेने विद्यार्थ्यांचे व्हिसासाठीचे अर्ज नाकारले आहेत. ऑक्टोबर २०२३ ते सप्टेंबर २०२४ दरम्यान अमेरिकेने सर्व देशांमधून आलेल्या ४१ टक्के विद्यार्थ्यांचे व्हिसा अर्ज नाकारले आहेत.

ऑक्टोबर २०२३ ते सप्टेंबर २०२४ दरम्यान अमेरिकेकडे ६.९९ लाख व्हिसा अर्ज आले होते. त्यापैकी २.७९ लाख अर्ज नाकारण्यात आले आहेत. तर, २०२२-२३ मध्ये आलेल्या ६.९९ लाख अर्जांपैकी २.५३ लाख अर्ज फेटाळण्यात आले होते.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने




एफ-१ व्हिसासाठी आलेल्या किंवा नाकारलेल्या देशनिहाय आर्जांची माहिती दिलेली नाही. परंतु, इंडियन एक्सप्रेसने गेल्या वर्षी ९ डिसेंबर रोजी वृत्त दिले होते की २०२४ च्या पहिल्या नऊ महिन्यांमध्ये भारतीयांना जारी केलेल्या विद्यार्थी व्हिसाच्या संख्येत २०२३ च्या तुलनेत (पहिल्या नऊ महिन्यांमधील आकडेवारी) तब्बल ३८ टक्के घट झाली आहे. सर्व देशांमधून येणाऱ्या अर्जांची संख्या देखील कमी झाल्याचं आकडेवारीवरून स्पष्ट झालं आहे.

२०१४-१५ मध्ये ८.५६ लाख अर्ज प्राप्त झाले होते. पुढील काळात यामध्ये थोडी-थोडी घट होत गेली. करोनानंतर यामध्ये थोडंसं प्रमाण वाढलं होतं. मात्र आता अर्ज नाकारण्याचं प्रमाण वाढल्याने अर्ज पाठवण्याचं प्रमाण आणखी कमी होण्याची चिन्हे आहेत. २०२३-२४ मध्ये अमेरिकेने ४.०१ लाख विद्यार्थ्यांना एफ-१ व्हिसा जारी केले. तर, २०२२-२३ मध्ये ४.४५ लाख व्हिसा जाहीर करण्यात आले होते. वर्षभरात यात ४४ लाखांची घट झाली आहे.

# ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर अमेरिकेचा येमेन विमानतळावर हवाई हल्ला

**वॉशिंग्टन, दि. २४ वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जिंकल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांचं पुढचं धोरण स्पष्ट केलं होतं. त्यानुसार आता राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्यासाठी काही महत्त्वाचे पण इतर देशांसाठी चिंतेचे ठरणारे निर्णय घेतले आहेत. त्यात बेकायदा स्थलांतरितांना मायदेशी पाठवण्यासोबतच इतर देशांवर टेरिफ लागू करण्याच्या निर्णयाचाही समावेश आहे. आता ट्रम्प यांनी आपला मोर्चा येमेनकडे वळवला असून हुतींना नामशेष करण्यासाठी भीषण बॉम्बहल्ले सुरू केले आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांनी येमेनमध्ये आश्रयास असणाऱ्या हुती बंडखोरांचा समूळ नायनाट करण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांमध्ये अमेरिकेकडून येमेनच्या वेगवेगळ्या भागांमध्ये हवाई हल्ले सुरू



करण्यात आले आहेत. या हल्ल्यांमध्ये हुती बंडखोरांना लक्ष्य करत असल्याचा दावा अमेरिकेकडून करण्यात आला आहे. मात्र, यात अनेक निरपराध नागरिकांचाही बळी जात असल्याचं दिसून येत आहे.

भारतीय प्रमाणवेळेनुसार रविवारी संध्याकाळी उशीरा अमेरिकन फायटर जेट्स विमानांनी येमेनमधील हुदेईदाह या महत्त्वाच्या विमानतळावर हवाई हल्ला केला. या हल्ल्यात शक्तिशाली मिसाईल्स डागण्यात आली. त्यामुले हुदेईदाह विमानतळाचं मोठं नुकसान झालं आहे. हा हल्ला हुतींना लक्ष्य करण्यासाठी केल्याचा दावा अमेरिकेकडून करण्यात आला आहे.

# टॉन्सिल -लक्षण,कारण आणि उपचार

**लोकारोग्य**

**हॅलो डॉक्टर**



माणसाचे शरीर म्हणजे विविध प्रकारच्या आजारांचे आगारच आहे असं म्हंटल तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. अति गॉड किंवा पिष्टमय पदार्थांचा आहारात समावेश झाला कि, मधुमेहाची बाधा होते. तद्वतच सातत्याने अति थंड पदार्थ किंवा पेयामुळे घशाजवळ टॉन्सिल सारखा विकार बळावतो. जर वेळीच उपचार केले आणि ठराविक पथ्य पाळली तर टॉन्सिल या आजारावर मात करता येन शकय आहे. मुळात,टॉन्सिल म्हणजे काय?या आजाराची लक्षण काय असतात?कारण काय असतात?आणि या आजाराचे उच्चाटन करण्यासाठी उपचार काय करायचे?या संधर्भात सविस्तर जाणून घेण्यासाठी ईएनटी तज्ज्ञ डॉ. चंद्रमणी चेन यांच्याशी बातचीत.

१]टॉन्सिल हा आजार नेमका काय आहे?

टॉन्सिल्स हे टिशू पॅड असतात जे अंडाकृती असतात. आणि घशाच्या मागील टोकाला असतात. घशाच्या प्रत्येक बाजूला एक असे हे दोन टॉन्सिल्स असतात. अनेकदा व्हायरल इन्फेक्शन मुळे किंवा बॅक्टेरियाची संसगर्गामुळे टॉन्सिलहा आजार उद्भवू शकतो. मात्र,टॉन्सिलचे वेळेवर निदान होणे देखील गरजेचे आहे.

२]टॉन्सिल या आजाराची कारण काय सांगता येतील?

विविध प्रकारच्या जिवाणूंचा संसर्ग हे टॉन्सिल उदभवण्याकरिता प्रमुख कारण आहे. विशेषतः ५ ते १५ वयोगटातील आणि ६५ वर्षावरील प्रौढांना वारंवार जिवाणू संसगर्गामुळे टॉन्सिल्स होण्याची शक्यता जास्त असते. मुले एकमेकांशी खेळताना जिवाणूंचा प्रार्दुभाव सहज होतो. तसेच वारंवार अति थंड पदार्थ किंवा पेय प्यायल्याने देखील टॉन्सिल्स होऊ शकतात.

३] टॉन्सिल्सची ठराविक लक्षण असतात का?

होय सर्व वयोगटातील मुलांना आणि प्रौढांना देखील टॉन्सिलची काही लक्षण दिसतात. टॉन्सिल्स हे घशाच्या बाजूला येतात लाल आणि वाढलेले किंवा सुजलेले असतात. टॉन्सिल्सवर पांढरे किंवा पिवळे डाग येतात. टॉन्सिल असलेल्या रुग्णाला ताप येणे,अन्न गिळताना त्रास होणे,श्वासात अडथळा निर्माण होणे,आवाजात बदल ,डोकेदुखी अशे लक्षण दिसतात. तर विशेषतः लहान मुलांमध्ये पोटात दुखणे,उलट्या,जेवणाची इच्छा न होणे हि लक्षण दिसतात.

४]टॉन्सिल्स वर उपचार नेमके काय आहेत?

टॉन्सिल्स पासून आराम मिळविण्यासाठी काही घरगुती उपचार आपण करू शकतो. भरपूर झोप घेणे,घशातील अस्वस्थता कमी करण्यासाठी उबदार पेय पिणे,सफरचंद,फ्लेवर्ड जिलेटीन,आणि गुळगुळीत स्वरूपाचे अन्न घ्या. मीठ पाण्याने गुळण्या करण्याचा सल्ला देखील डॉक्टर देतात. टॉन्सिल मध्ये बॅक्टेरियाचा संसर्ग असेल तर डॉक्ट प्रतिजैविक देतात. जुनाट टॉन्सिल असेल तर शाश्त्रक्रिया करून टॉन्सिल्स काढून देखील टाकता येतात

# मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या मार्गावर अपघात
## 25 गाड्या रद्द, रेल्वे मार्गावर परिणाम

**अहमदाबाद, दि. २४ वृत्तसंस्था**

अहमदाबाद-मुंबई दरम्यान बांधल्या जात असलेल्या बुलेट ट्रेनच्या मार्गावर मोठा अपघात झाला. बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या ठिकाणी अहमदाबादच्या वटवाजवळ सेगमेंटल लॉन्चिंग गॅन्ट्री कोसळून मोठा अपघात झाला. रविवारी रात्रीच्या सुमारास हा अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही नसून कोणीही जखमी झालेले नाही. मात्र या अपघातामुळे अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या आहेत. तर गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. त्यामुळे रेल्वेच्या वेळापत्रकार मोठा परिमाण झाला आहे.

अहमदाबादच्या वटवाजवळ मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान सेगमेंटल लॉन्चिंग गॅन्ट्री निसटली. रात्री ११ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाल्याने मुंबई-अहमदाबाद रेल्वे मार्गावरील गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला. अपघातामुळे अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत तर काही शॉर्ट टर्मिनेट करण्यात आल्या आहेत. काँक्रीट गर्डर टाकल्यानंतर गॅन्ट्री मागे घेतली जात असताना त्याचा तोल सुटला आणि हा अपघात घडला. या दुर्घटनेमुळे बुलेट ट्रेनच्या बांधकामाधीन मार्गाचे कोणतेही नुकसान झाले नाही. मात्र जवळपासच्या रेल्वे रुळांचे किरकोळ नुकसान झालं ज्यामुळे रेल्वेच्या वाहतुकीवर परिणाम झालाय.



या दुर्घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने अपघात निवारण ट्रेन रवाना केली आणि नॅशनल हाय-स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी, पोलीस आणि अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले. या अपघातानंतर जवळपास २५ गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर ५ गाड्यांचे वेळापत्रक बदलण्यात असून ६ गाड्यांचे मार्ग बदलण्यात आलेत. रेल्वे मार्ग मोकळा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत जेणेकरून लवकरात लवकर वाहतूक पूर्ववत करता येईल. या कामासाठी क्रेनचाही वापर करण्यात येत आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मुंबई सेंट्रल-गांधीनगर राजधानी वंदे भारत एक्सप्रेस (२०९०१) अंशतः रद्द करण्यात आली आहे. याशिवाय नडियाद-गांधीधाम दरम्यान ट्रेन क्रमांक २०९३६ इंदूर-गांधीधाम एक्स्प्रेस अंशतः रद्द करण्यात आली. ट्रेन क्रमांक १९३१० इंदूर-अहमदाबाद शांती एक्स्प्रेस रद्द करुन आनंद स्थानकावर थांबवण्यात आली. तर गाडी क्रमांक ०९४१२ ग्वाल्हेर-अहमदाबाद स्पेशल छायापुरी-अहमदाबाद दरम्यान अंशत: रद्द करण्यात आली. ट्रेन क्रमांक १९१६६ दरभंगा-अहमदाबाद साबरमती एक्सप्रेस ही महमुदाबाद खेडा रोड स्थानकापर्यंतच चालवण्यात आली.

अपघातानंतर रेल्वे प्रशासनाने वटवा-बोरिवली एक्सप्रेस, अहमदाबाद-मुंबई सेंट्रल एक्सप्रेस, वडोदरा-वटवा इंटरसिटी, अहमदाबाद-वलसाड गुजरात क्वीन, जामनगर-वडोदरा इंटरसिटी, वडनगर-वलसाड-वडनगर एक्सप्रेस, वाटवा-आनंद एक्सप्रेस यासह सुमारे २५ गाड्या रद्द केल्या आहेत. प्रवाशांच्या मदतीसाठी रेल्वेकडून हेल्पलाइन क्रमांक जारी करण्यात आला आहे.

# नेफ्रोप्लसची सर्वात मोठी किडनी आरोग्य तपासणी मोहिम

**जनआरोग्य**

आशियातील सर्वात मोठे डायलिसिस केअर नेटवर्क असलेल्या नेफ्रोप्लसने ६ ते ११ मार्च २०२५ या कालावधीत १०,५०१ नोंदणीसह 'एका आठवड्यात ऑनलाइन किडनी आरोग्य तपासणीसाठी साइन अप करणारे सर्वाधिक लोक' या शीर्षकासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स शीर्षक मिळवून एक महत्त्वपूर्ण




टप्पा गाठला आहे.

'तुमचे मूत्रपिंड ठीक आहेत का? लवकर शोधा आणि मूत्रपिंड आरोग्याचे रक्षण करा' या घोषणेखाली आयोजित केलेल्या मोफत किडनी तपासणी शिबिरांना हजारो सहभागींकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात विशेषतः मधुमेह आणि उच्च रक्तदाब असलेल्यांसह उच्च जोखीम असलेल्या व्यक्तींना लक्ष्य केले गेले होते, ज्यामध्ये मूत्रपिंड रोग रोखण्यासाठी लवकर निदानाचे महत्त्व अधोरेखित केले गेले होते. या मोहिमेत समाविष्ट असलेल्या प्रमुख शहरांमध्ये बंगळुरू, दिल्ली, जयपूर, पुणे, हैदराबाद, लखनऊ आणि रांची यांचा समावेश होता.

या प्रसंगी, नेफ्रोप्लसने क्रॉनिक किडनी डिसीज (CKD) वर एक अभूतपूर्व अभ्यास देखील सुरु केला. या स्क्रीनिंगद्वारे गोळा केलेल्या विस्तृत ऑफलाइन डेटासह, कंपनी एका प्रतिष्ठित शैक्षणिक जर्नलमध्ये एक श्वेतपत्रिका आणि हस्तलिखित प्रकाशित करण्याची योजना आखत आहे - बहुधा CKD प्रतिबंधावरील हा पहिलाच जागतिक श्वेतपत्रिका असेल. हे CKD विरुद्धच्या जागतिक लढाईत एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि मूत्रपिंड आरोग्य नवोपक्रमात नेफ्रोप्लसच्या नेतृत्वाला बळकटी देते.

# आरोग्यवर्धक मेथी दाणे



**आरोग्यम धनसंपदा**

मेथी शरीरासाठी खूपच फायदेशीर असते. यामध्ये अनेक पोषक तत्व आढळतात. खाण्यात स्वादिष्टपणा आणण्यापासून ते अगदी पचनशक्ती चांगली राहण्यापर्यंत मेथी दाण्यांचा वापर करून घेता येतो. मेथी दाण्याचे पाणी उपाशीपोटी पिण्याचा सल्ला आयुर्वेदिक डॉक्टरांकडूनही देण्यात येतो. भिजवलेल्या मेथी दाण्याचे पाणी हे अनेक आजारांवर गुणकारी ठरते. मेथी दाण्यामध्ये अनेक पोषक तत्व असतात. सोडियम, पोटॅशियम, फायबर, लोह, कॅल्शियम, विटामिन डी आणि विटामिन सी च्या पोषक तत्वाने मेथी दाण्याचे पाणी भरलेले आहे.मेथी दाण्याचे पाणी पिण्याने पचनशक्ती सुधारण्यासह शरीरातील कमकुवतपणा कमी होतो आणि हाडंही मजबूत होतात. तसंच पोटातील चरबी कमी होऊन त्वरीत वजन कमी होते.मेथीच्या पाण्यामध्ये अँटीबॅक्टेरियल, अँटी इन्फ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट्स गुण असतात, जे शरीराला हेल्दी ठेवत अनेक आजारांना दूर करतात.

तुम्हाला बऱ्याच काळापासून वजन कमी करायचे असेल तर मेथीचे पाणी यासाठी उपयुक्त ठरू शकते. या पाण्यात अधिक प्रमाणात फायबर असते, जे पोट भरलेले ठेवते. यामुळे अतिरिक्त भूक लागत नाही आणि उगीचच पदार्थ खाल्ले जात नाहीत. यामुळे वजन कमी करण्यास मदत मिळते. तसंच मेथी दाण्यातील आढळणारे गुण पोटावरील चरबी जाळण्यास मदत करतात.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# प्रशांत कोरटकरच्या मुसक्या आवळल्या...

प्रशांत कोरटकरला आता एका महिन्यानंतर तेलंगणामधून अटक केली आहे. त्या ठिकाणी नोंद केल्यानंतर कोल्हापूर पोलिस त्याला ताब्यात घेतील. इंद्रजीत सावंत यांनी कोरटकर विरोधात कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलिस ठाण्यात तक्रार नोंद केली होती. त्यामुळे कोरटकरला आता कोल्हापूरला आणण्यात येणार आहे. प्रशांत कोरटकरचा अंतरिम जामीन उच्च न्यायालय फेटाळणार असल्याची जाणीव झाल्यानंतर त्याच्यासमोर कोणताही पर्याय शिल्लक राहिला नाही. त्यामुळे त्याला पोलिसांसमोर शरण येण्याशिवाय कोणताही पर्यात नव्हता. त्याचमुळे आता पोलिसांनी त्याला अटक केल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून केला जात आहे. प्रशांत कोरटकरने आधी कोल्हापूर न्यायालयामध्ये जामिनासाठी अर्ज केला होता. कोल्हापूर न्यायालयाने त्याचा अर्ज फेटाळल्यानंतर त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. पण कोल्हापुरात जी चूक केली होती तीच चूक कोरटकरने उच्च न्यायालयात केली. उच्च न्यायालयातही कोरटकरने अंतरिम जामिनासाठी अर्ज केला. पण एका न्यायालयाने अंतरिम जामीन अर्ज फेटाळल्यानंतर वरचे न्यायालयही तो जामीन स्वीकारत नाही. त्याचमुळे कोरटकरसमोर कोणताही पर्याय नसल्याची माहिती आहे.

# संजय राऊत यांचा शिंदे गटावर हल्लाबोल...

त्यांना गृहखाते झेपत नाही किंवा त्यांना काम करू दिले जात नाही.” राऊत यांनी बीड, परभणी आणि नागपूर येथील अलीकडील घटनांचा दाखला देत राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “आता मुंबईत एका पॉडकास्टरचा सेट तोडला गेला. पोलीस काय झोपा काढत होते का?” असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

**"महाराष्ट्रात गुंडाराज, फडणवीस काय करणार?"**

राऊत यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर ‘गुंडाराज’ चालवण्याचा आरोप करत पुढे म्हटले, “महाराष्ट्रात आणीबाणी लावली आहे का? कॉमेडियन्सना बोलू देणार नाही? हे फडणवीसांनी स्पष्ट करावे. नागपूरच्या दंगलखोरांकडून नुकसान भरपाई वसूल करणार, असे फडणवीस म्हणाले होते. मग खारमध्ये सेट तोडणाऱ्या दंगलखोरांना सोडणार का? त्यांच्याकडून नुकसान भरपाई वसूल करणार की नाही?” राऊत यांनी हे प्रश्न उपस्थित करत सामान्य जनतेच्या भावना व्यक्त केल्याचा दावा केला. “महाराष्ट्राच्या राजधानीत गुंडाराज चालत आहे. हे सरकार जनतेच्या हिताचे नाही,” असेही ते म्हणाले.

कुणाल कामराने आपल्या शोमध्ये एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणे सादर केल्याने शिंदे गट संतप्त झाला आहे. या गाण्यात शिंदे यांच्या २०२२ च्या बंडखोरीचा उल्लेख होता, ज्यामुळे त्यांनी स्टुडिओवर हल्ला चढवला. दुसरीकडे, ठाकरे गटाने या घटनेचा वापर करत शिंदे गट आणि फडणवीस सरकारवर अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचा आरोप केला आहे. संजय राऊत यांच्या या वक्तव्याने दोन्ही गटांमधील संघर्ष तीव्र झाला असून, येत्या काळात या प्रकरणावरून आणखी राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता आहे. पोलिसांनी या तोडफोडीप्रकरणी तपास सुरू केला असला तरी, कोरटकर प्रकरणावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, ज्यामुळे राऊत यांच्या टीकेला आणखी बळ मिळाले आहे.

पान १ वरून

# विधान परिषेदत राडा...

विरोधी पक्षनेत्यांबाबत आमचं काही म्हणणं नाही. पण त्यांच्यावर दबाव असल्याने हे बोलत आहेत. कुणाल कामरा राहुल गांधींबरोबर भारत जोडो यात्रेत होता. तसंच एकनाथ शिंदेंपुरता हा विषय मर्यादित नाही. त्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींबाबत जी काही वाक्य बोलली आहेत ती इथे सांगण्यासारखी नाहीत. मराठी भाषेचा मंत्री मी इथे आहे. अशा गोष्टींचं समर्थन कुणी करु नये. एकनाथ शिंदे यांचा सत्कार महाराष्ट्राची संस्कृती जपली म्हणून वारकरी बांधवांनी केला होता त्यांच्याबाबत कुणाल कामरा बोलला आहे, आनंद महिंद्रा, मुकेश अंबांनींबाबत बोलला आहे. आपण त्याचं समर्थन करता कामा नये. असं उदय सामंत म्हणाले.

कुणाल कामराचा व्हिडीओ आल्यानंतर ३४ मिनिटांत एक ट्वीट येतं आणि ते कुणाल कामराचं समर्थन करणारं असतं. नंतर लगेच दुसरं ट्वीट येतं. आमची मागणी आहे की त्याचा बोलविता धनी कोण? ते शोधलं गेलं पाहिजे. तुमच्या नेत्यांबाबत काही घडलं तर आम्ही तुमच्या मागे उभे राहू. एकनाथ शिंदेंवर टीका करायची, राजकारण करायचं हे काही लोकांनी ठरवून सुरु केलं आहे. ज्या पद्धतीने बोललं गेलं ती विकृती आहे ती विकृती आपण ठेचली पाहिजे. भारत जोडो यात्रेतून हा माणूस फिरतो त्याचा अर्थ आम्ही काय समजायचा? भविष्यात कुणाच्याही बाबतीत असे वाद व्हायला नको हे करणं आवश्यक आहे. राजकारणातही माणुसकी असते याचा विचार केला पाहिजे. आज जे आमच्यावर आलं आहे ते भविष्यात तुमच्यावरही येऊ शकतं, असं उदय सामंत म्हणाले. तसंच हे असं संकट तुमच्यावर आल्यास आम्ही तुमच्यासह उभे राहू. असंही उदय सामंत यांनी म्हटलं. कुणाल कामराच्या मुद्द्यावरुन सभागृहात गदारोळ वाढल्यानंतर १० ते १५ मिनिटांसाठी सभागृह तहकूब करण्यात आलं.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com